



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com





* वर्ष ६५ वे * अंक १७४ * नांदेड * बुधवार, दि. १ जुलै २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

## बंगालच्या उपसागरात पुन्हा कमी दाबाचे क्षेत्र

# ३ ते ७ जुलै दरम्यान महाराष्ट्रात मुसळधार पावसाची शक्यता

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यातील बहुतांश भागात पावसाला सुरुवात झाली आहे. काही भागात पेरणीच्या कामांना देखील वेग आल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. तर काही भागात आणखी चांगल्या पावसाची गरज आहे. अशातच हवामान विभागाचे शास्त्रज्ञ एस.डी. सानप यांनी पावसासंदर्भातील अंदाज वर्तवला आहे. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, ३ ते ७ जुलै दरम्यान महाराष्ट्रात सर्वदुर पावसाची शक्यता आहे. बंगालच्या उपसागरात पुन्हा कमी दाबाचे क्षेत्र तयार होत आहे. त्यामुळं पाऊस परतण्याची शक्यता आहे.

३ ते ७ जुलै दरम्यान महाराष्ट्रातील सागरी किनारपट्टीवर मुसळधार पाऊस पडेलच त्याचबरोबर विदर्भ आणि मराठवाड्यात देखील ऑरेंज अलर्ट असेल अशी माहिती हवामान विभागाचे शास्त्रज्ञ एस.डी. सानप यांनी दिली आहे. यावर्षी एल निनोमुळे पाऊस कमी आहे, हे आधीच सांगितले आहे. मॉन्सूनचे वारे कमकुवत आहेत. एल निनोचा परिणाम पुढील वर्षी देखील जाणवणार असला तरी पुढील वर्षीच्या पावसाचा अंदाज आता सांगता येणार नाही, अशी माहिती हवामान विभागाचे शास्त्रज्ञ एस.डी. सानप यांनी दिली.

रायगड जिल्ह्याला पुढील पाच दिवस पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. तसेच रायगडच्या दक्षिण भागात पावसाने हजेरी लावत शेतकऱ्यांना दिलासा दिला आहे. रायगडमध्ये २३ जूनला सुरू झालेल्या पावसाने दोन दिवस दडी मारली होती. मात्र, सोमवारपासून पुन्हा पाऊस बरसू लागल्याने शेतकऱ्याला मोठा दिलासा मिळाला आहे. पावसाचा जोर कायम राहिल्यास पुढील दिवसात शेतीची लावणी सुरू होण्याची शक्यता आहे. रायगडमधील अनेक नद्यांच्या पाणीपातळीमध्ये देखील हळूहळू वाढ होत असून पाण्याची चिंता मिटली आहे.

हिंगोली जिल्ह्यातील वसमत तालुक्यात जोरदार पावसाने हजेरी लावली आहे. मुसळधार पावसामुळे हयातनगर, लिंगी, पळशीसह परिसरातील शिवार जलमय झाले असून अनेक शेतांमध्ये पाणी साचले आहे. जोरदार पावसामुळे लहान-मोठे ओढेही दुथडी भरून वाहू लागले आहेत. पेरणीसाठी आवश्यक असलेला हा पहिला समाधानकारक पाऊस असल्याने शेतकरी वर्गात आनंदाचे वातावरण पसरले आहे. वसमत तालुक्यातील हयातनगर, लिंगी आणि पळशी परिसरात मुसळधार पावसाने हजेरी लावली. अवघ्या काही वेळात शेतांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साचले, तर अनेक ओढे प्रवाहित झाल्याने परिसरातील निसर्गही बहरून गेला. गेल्या महिनाभरापासून पावसाच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांसाठी हा पाऊस दिलासादायक ठरला आहे. आता पेरणीच्या कामांना वेग येणार असल्याने बळीराजाच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य दिसून येत आहे.

## नांदेड गुरुद्वारा सुधारणा कायदा स्थगित

### महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची माहिती

**मुंबई/नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड येथील ऐतिहासिक व पवित्र श्री हजूर अबचलनगर सचखंड गुरुद्वाराच्या प्रशासकीय व्यवस्थेबाबत १९५६ च्या जुन्या कायद्यात प्रस्तावित सुधारणांविषयी शीख समाजात असलेल्या भावना लक्षात घेऊन, राज्य सरकारने हा कायदा तूर्तास स्थगित करण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार हा कायदा विधिमंडळात आणणे लांबणीवर टाकण्यात आले असून, आता एका उच्चस्तरीय समितीच्या माध्यमातून शीख समाजाचे मत ऐकून घेतल्यानंतरच पुढील पाऊल उचलले जाईल, अशी माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

विधानभवनातील पत्रकार कक्षात आयोजित पत्रकार परिषदेत महसूलमंत्री **(पान ६ वर...)**

## जिल्हा बँकेच्या निवडणुकीत खा.रवींद्र चव्हाण, आ.चिखलीकर, आ. केराम, आ.राजेश पवार, जवळगावकर, हंबर्डे यांचे अर्ज दाखल

### एकूण २३ जागांसाठी २५५ अर्ज दाखल; आज होणार छाननी





### माजी आ. जवळगावकर यांचा भाजप नेत्यांसोबत अर्ज





**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी सोमवार, दि. ३० जून रोजी इच्छुकांची झुंबड उडाली होती. विविध गटांच्या प्रमुख नेत्यांसह इच्छुक उमेदवारांनी मोठ्या संख्येने निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात हजेरी लावून अर्ज दाखल केले. दुपारी ३ वाजेपर्यंत एकूण २५५ उमेदवारी अर्ज दाखल झाले असून आज १ जुलै रोजी छाननी होणार आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे काँग्रेस नेते माजी आ. माधवराव पाटील जवळगावकर यांनी भाजप नेत्यांच्या सोबतीने आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या २३ जागांसाठी निवडणूक होत आहे. नांदेड जिल्ह्यातील सहकाराचे राजकारण आपल्या हातात घेण्यासाठी महायुतीमधील दिग्गज नेते भाजप खा. अशोकराव चव्हाण, **(पान ६ वर...)**



## नांदेड जि.प.च्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी महेश पाटील नियुक्त



**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) मेघना कावली या प्रसूती रजेवर गेल्याने त्यांच्या जागी राज्य शासनाने महेश पाटील यांची मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे.

महेश पाटील हे यापूर्वी पुणे येथील 'सारथी' संस्थेत व्यवस्थापकीय संचालक म्हणून कार्यरत होते. शासनाने त्यांना तत्काळ नांदेड येथे रुजू होण्याचे आदेश दिले असून सध्याचा कार्यभार सहकारी समकक्ष अधिकारी सतीश खोडके यांच्याकडे सुपूर्द करून नियुक्तीच्या ठिकाणी हजर राहण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच रुजू झाल्यानंतर त्याबाबतचा अनुपालन अहवाल शासनाकडे तातडीने सादर करण्याचेही आदेश राज्य शासनाने दिले आहेत.

## उमरी येथील दोन पोलीस निलंबित; एसपी डॉ. निलाभ रोहन यांचा दणका

**नांदेड (प्रतिनिधी)–** उमरी पोलीस ठाण्यात कर्तव्यात कसूर करणाऱ्या आणि भ्रष्टाचारात अडकलेल्या दोन पोलिसांवर पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांनी निलंबनाचा आदेश काढला आहे. उमरी पोलीस ठाण्यातील या तडकाफडकी कारवाईमुळे अवैध कारभार करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

उमरी पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले चालक सिद्धीकी आणि सुनील गोपाळराव कोलबुद्धे हे दोघे जनतेकडून पैसे स्वीकारत असतानाचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर जोरदार व्हायरल झाला होता. हा व्हिडिओ थेट पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्यापर्यंत पोहोचला. पुराव्यानिशी समोर आलेल्या या प्रकाराची गंभीर दखल घेत अधीक्षकांनी या दोन्ही कर्मचाऱ्यांना तातडीने निलंबित करण्याचे आदेश दिले आहेत.

विशेष म्हणजे, डॉ. निलाभ रोहन यांनी नांदेडचा पदभार स्वीकारल्यानंतर सर्व पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना स्पष्ट सूचना दिल्या होत्या की, कोणत्याही प्रकारचा अवैध कारभार करू नका आणि जनतेला नाहक त्रास देऊ नका असा इशाराही त्यांनी दिला होता.

## आजपासून विनाएचएसआरपी नंबर प्लेट वाहनांवर कारवाई

**मुंबई (प्रतिनिधी)–** आज १ जुलैपासून राज्यात विनाएचएसआरपी नंबर प्लेट वाहनांवर दंडात्मक कारवाई होणार आहे. शासनाने दिलेली मुदत संपल्यानंतर हा कारवाईचा बडगा उचलण्यात येणार आहे.

## पोलीस उपमहानिरीक्षक उमाप यांचा नांदेडमधील तक्रारदारांशी 'संवाद'

**नांदेड (प्रतिनिधी)–** नागरिकांच्या तक्रारी समजावून घेऊन, त्यांचा जलद निपटारा करणे व पोलीस - नागरिक यांच्यातील संवाद वाढवून, लोकाभिमुख कामकाजाद्वारे जनतेचा पोलिसांवरील विश्वास दृढ करणे, या उद्देशाने पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी नांदेड परिक्षेत्रातील चारही जिल्ह्यांत 'जनसंवाद' उपक्रम सुरू केला आहे. या अनुषंगाने मंगळवारी नांदेड जिल्ह्यातील तक्रारदारांशी त्यांनी संवाद साधला.





परिक्षेत्रातील चारही जिल्ह्यांच्या कामगिरीचा आढावा घेण्यासाठी, पोलीस उपमहानिरीक्षक हे प्रत्येक महिन्यात जिल्हा मुख्यालयांना भेटी देत असतात. यादरम्यान, त्या-त्या जिल्ह्यातील तक्रारदारांना प्रत्यक्ष भेटून, त्यांच्या तक्रारी व अडीअडचणी समजावून घेऊन, त्या तत्परतेने सोडवण्याचा पोलीस उप महानिरीक्षक यांचा प्रयत्न आहे.

दि. ३० जून रोजी, पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी, पोलीस अधीक्षक, नांदेड कार्यालयात जिल्हा पोलिसांच्या कामकाजाचा मासिक आढावा घेतल्यानंतर, दुपारी ३ ते ५ या वेळेत जिल्ह्यातील तक्रारदारांशी 'संवाद' साधला. यादरम्यान, एकूण (३९) तक्रारदारांनी आपले लिखित अर्ज पोलीस उपमहानिरीक्षक यांना सोपविले. यात, मालमत्ता विषयक वाद, हरवलेले इसम, मारहाणी बाबत, सायबर फसवणूक व दाखल गुन्ह्यांचा तपास इत्यादी तक्रारींचा समावेश आहे.

तक्रारदारांकडून प्राप्त होणाऱ्या अर्जांच्या शिघ्र सोडवणुकीसाठी, पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालयाने यापूर्वीच 'संवेदना' ही तक्रार निवारण प्रणाली सुरू केली आहे. मंगळवारी 'जनसंवाद' उपक्रमादरम्यान, प्राप्त झालेले सर्व अर्ज 'संवेदना' पोर्टलच्या माध्यमातून पुढील चौकशी व कार्यवाहीसाठी संबंधित अधिकाऱ्यांकडे वर्ग करण्यात येणार असून, प्रत्येक तक्रारीवर झालेल्या कार्यवाहीचा आढावा नांदेड परिक्षेत्र कार्यालयातील फीडबॅक टीममार्फत घेण्यात येणार आहे.

याप्रसंगी पोलीस अधीक्षक निलाभ रोहन, अपर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील, अपर पोलीस अधीक्षक सुरज गुरव, नांदेड जिल्ह्यातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी व शहरातील पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी हे हजर होते.




जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील


# शेतकरी आत्महत्या: तात्पुरती मलमपट्टी ?

देशाचा अन्नदाता आज स्वतःच्या अस्तित्वासाठी झगडत आहे, ही कोणत्याही लोकशाहीसाठी गंभीर इशारा देणारी बाब आहे. शेतकरी आत्महत्या हा केवळ आर्थिक प्रश्न नसून तो सामाजिक, मानवी आणि नैतिक जबाबदारीचा विषय आहे. सरकार, प्रशासन, वित्तीय संस्था आणि समाज यांनी एकत्र येऊन शेतीला शाश्वत आणि सन्मानजनक व्यवसाय बनविण्याचा निर्धार केला, तरच शेतकऱ्यांच्या डोळ्यांतील अश्रू थांबतील. अन्यथा प्रत्येक वर्षी वाढणारी आत्महत्यांची आकडेवारी ही आपल्या विकासाच्या दाव्यांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत राहील. आज महाराष्ट्र शेतकरी आत्महत्यांच्या बाबतीत देशात प्रथम क्रमांकाचा ठरत आहे, ही अत्यंत वेदनादायी आणि लाजिरवाणी बाब आहे. राष्ट्रीय गुन्हे नोंद विभागाच्या आकडेवारीनुसार २०२३ मध्ये राज्यात तब्बल ६,६६९ शेतकरी आणि शेतमजुरांनी आत्महत्या केल्या. हा आकडा केवळ सांख्यिकी नाही, तर हजारो उद्ध्वस्त कुटुंबांचा, अनाथ झालेल्या मुलांचा आणि उद्ध्वस्त झालेल्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा हृदयद्रावक दस्तऐवज आहे. ही परिस्थिती केवळ कर्जबाजारीपणामुळे निर्माण झालेली नाही. हवामान बदल, शेतीमालाला न मिळणारा योग्य भाव, वाढते उत्पादन खर्च, अपुरी सरकारी धोरणे, बाजारातील अस्थिरता आणि विमा योजनांतील त्रुटी या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणजे शेतकरी आत्महत्यांचे वाढते प्रमाण होय. मराठवाडा आणि विदर्भासारख्या पावसावर अवलंबून असलेल्या भागांना दुष्काळ, अवकाळी पाऊस आणि उष्णतेच्या लाटांचा मोठा फटका बसला. कापसावरील गुलाबी बोंडअळीच्या प्रादुर्भावामुळे अनेक शेतकऱ्यांचे पीक पूर्णपणे नष्ट होते. त्यातच बियाणे, खते, कीटकनाशके आणि डिझेलच्या किमती प्रचंड वाढल्या; मात्र किमान आधारभूत किंमतीत त्यानुसार वाढ झाली नाही. परिणामी, शेती तोट्याचा व्यवसाय ठरत चालला आहे. त्याहून अधिक गंभीर बाब म्हणजे भूमिहीन शेतमजुरांची अवस्था. देशभरातील कृषी क्षेत्रातील आत्महत्यांमध्ये मोठा वाटा हा शेतमजुरांचा आहे. रोजगार हमी योजनेची प्रभावी अंमलबजावणी न होणे, वेळेवर मजुरी न मिळणे आणि पर्यायी रोजगाराच्या संधींचा अभाव यामुळे त्यांचे जीवन अधिकच असुरक्षित झाले आहे. ज्यांच्याकडे जमीनच नाही, त्यांना ना पीकविमा मिळतो, ना कर्जमाफीचा लाभ मिळतो. बँकांकडून नवीन कर्ज मिळत नसल्याने अनेक शेतकरी खासगी सावकारांच्या जाळ्यात अडकतात. २४ ते ६० टक्क्यांपर्यंत व्याजदर आकारणाऱ्या सावकारांच्या कर्जामुळे शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी आणखी वाढते. पीकविमा योजनांमध्येही अनेक त्रुटी असल्याने नुकसान होऊनही अनेकांना योग्य भरपाई मिळत नाही. त्यामुळे शासनाच्या योजनांवरील विश्वासही डळमळीत होत आहे. बँकेकडून घेतलेल्या कर्जाची देखील हीच अवस्था आहे. यावर उपाय म्हणून नुकतेच महाराष्ट्र शासनाने कर्जमुक्ती योजना जाहीर केली आहे, पण त्यातल्या नियम व अटी पाहता या योजनेचा लाभ होऊ नये अशीच व्यवस्था केली की काय असे वाटल्यास नवल नाही. दरवेळी आत्महत्यांची आकडेवारी जाहीर झाल्यानंतर मदतीच्या घोषणा, कर्जमाफीची आश्वासने किंवा आर्थिक पॅकेजची घोषणा केली जाते. मात्र या तात्पुरत्या उपायांनी प्रश्न सुटत नाही. शेतकऱ्यांना हमीभावाची कायदेशीर हमी, हवामान बदलाशी सुसंगत शेती धोरण, सिंचन सुविधांचा विस्तार, पीकविमा योजनांमध्ये पारदर्शकता, ग्रामीण रोजगाराच्या संधी आणि सावकारीवर प्रभावी नियंत्रण या दीर्घकालीन उपाययोजना राबविण्याची गरज आहे. यासाठी शेतकऱ्यांचे प्रभावी संघटन असणे गरजेचे आहे आणि ही संघटना शासनाच्या दावणीला बांधलेली असू नये तरच शेतकऱ्यांच्या पदरात काहीतरी पडेल.

# आभासी जगातील आजचा समाज

माहिती क्रांती आणि तंत्रज्ञानाच्या विकासामुळे एक कृत्रिम जग निर्माण झाले आहे. एक असे जग जिथे काहीही वास्तविक नाही, सर्वकाही आभासी आहे. कृत्रिम समाज, कृत्रिम माणसं, कृत्रिम नाती, कृत्रिम भावना, कृत्रिम बुद्धिमत्ता, कृत्रिम सौंदर्य आणि इतकंच नव्हे तर कृत्रिम जीवन, कृत्रिम श्वास आणि अगदी कृत्रिम हसणंदेखील! सर्वकाही आभासी! याचा परिणाम असा होतोय की आभासी वस्तूंसोबत जगत असताना माणूस वास्तविक जीवनापासून दूर जात आहे. आभासी जगात सर्व काही क्षणिक, तात्पुरते आहे, सामाजिक आणि जवळचे नातेदेखील तात्पुरते आणि कृत्रिम होत चालले आहे. जोपर्यंत त्या गोष्टी उपयुक्त आहेत तोपर्यंत त्याचा किंवा त्याच्या संबंधांचा वापर करा, आणि जेव्हा त्यांची आवश्यकता नसते तेव्हा त्यांच्याशी नाते समाप्त करा. संबंध तोडून टाका. वास्तविक आज जीवन संगणकाच्या एका क्लिकसारखे सोपे झाले आहे. तुम्हाला हव्या असलेल्या गोष्टी एका क्लिकवर तुमच्यापर्यंत पोहोचतात. असे म्हणता येईल की अत्याधुनिक तंत्रज्ञान म्हणजे संगणक, स्मार्टफोन इ. आधुनिक जगातील हे असे जिन्नस आहेत जे आपली इच्छा व्यक्त करताच आपल्या 'आका' ची आज्ञा पूर्ण करण्यास तत्पर असतात. फरक एवढाच आहे की पूर्वीचे जिन फक्त आजा- आजीच्या गोष्टींमध्येच असायचे, तर आजचे आधुनिक जीवन हे वास्तव जगाचा अविभाज्य भाग बनले आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानातील अभूतपूर्व प्रगतीमुळे तर्कशुद्धतेचे महत्त्व दिवसेंदिवस कमी होत असल्याचेही समाजशास्त्रज्ञ हॅबरमास यांनी म्हटले आहे.

आता माणसाची तर्कशुद्धता त्याला ध्येयाकडे जाण्यास प्रवृत्त करत नाही, तर केवळ संसाधने गोळा करण्यास मदत करते. याचाच परिणाम म्हणजे मानवाने निर्माण केलेल्या आधुनिक तंत्रज्ञानाने माणसालाच आपला गुलाम बनवले आहे. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे आधुनिक माणूस स्वत:ला पूर्वीपेक्षा अधिक मुक्त समजू लागला आहे, तर वास्तव हे आहे की तो पूर्वीपेक्षा अधिक परावलंबी होत चालला आहे. काही काळापूर्वीची एक घटना इथे नमूद करणे समर्पक ठरेल. आसाममधील एक नवविवाहित जोडपे त्यांच्या विवाह समारंभानंतर एका करारावर स्वाक्षरी करते. या करारात दोघांनीही काही अटी ठेवल्या आहेत जसे की महिन्यातून एकच पिझ्झा खाणे, घरच्या जेवणाला नेहमी हो म्हणणे, रोज साडी नेसणे, रात्री उशिरा पार्टी करायला पण फक्त एकमेकांसोबत जाणे, रोज जीमला जाणे, दर रविवारी सकाळी नवऱ्याने तयार




केलेला नाश्ता खाणे. पंधरवड्याला खरेदी करायला जाणे इ.

नात्यात एवढा कृत्रिमपणा आणि अविश्वास आहे की लेखी तडजोड करण्याची गरज भासते हेच नवल! काही वर्षांपूर्वी अशाच प्रकारची घटना एका महानगरात घडली होती, ज्यामध्ये वधू-वरांनी लग्न समारंभात फेऱ्या मारत असताना अशा कराराची चर्चा केली होती, ज्यानुसार ते सहा महिने एकत्र राहतील आणि त्यांच्यात जमले नाही तर, ते कोणत्याही कायदेशीर कारवाईशिवाय परस्पर संमतीने वेगळे होतील. एक काळ असा होता जेव्हा विवाह म्हणजे संस्कार आणि पवित्र बंधन मानले जात होते, आज तीच विवाह नावाची संस्था आधुनिक समाजात मोडकळीस आली आहे. ही केवळ आभासी जगाची देणगी आहे. दोन-तीन वर्षांपूर्वी एका चिनी शास्त्रज्ञाने जीनोम-मॉडिफिकेशन तंत्रज्ञानाने जुळ्या मुली जन्माला घातल्याचा दावा करून वैद्यक आणि संशोधनाच्या जगात खळबळ उडवून दिली होती. या शास्त्रज्ञाने असा दावा केला आहे की, असे डिझायनर बाळ संक्रमण आणि कर्करोगासारख्या गंभीर आजारांपासून सुरक्षित असेल. बेबीक्लोन ही कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाच्या (ख) क्षेत्रातील एक नवीन क्रांती आहे.

नैसर्गिक कृतीशी छेडछाड करून मानवी जीवनाला कोणत्या प्रकारच्या आव्हानांना सामोरे जावे लागू शकते किंवा जनुकीय सुधारित बाळांचा भावी पिढ्यांवर कसा परिणाम होऊ शकतो हे सांगणे कठीण आहे. त्यामुळे हा प्रश्न शेवटी विचार करायला भाग पाडतो की असे कोणते जग उदयास येत आहे जिथे लग्नासाठी पुतळा, लैंगिक इच्छांसाठी रोबोट आणि सिलिकॉन बेबी लोकांच्या पसंतीस उतरत आहेत. म्हणजेच एक आभासी जग जिथे काहीही वास्तविक नाही. लग्न, पती-पत्नीच्या नात्यापासून ते मुलापर्यंत सर्व काही खोटे आहे. आणखी एक धक्कादायक उदाहरण म्हणजे आभासी जग. या वर्षाच्या सुरुवातीला तामिळनाडूतील तरुण-तरुणीच्या लग्नासाठी आभासी जग तयार करण्यात आले होते. यामध्ये वराच्या मृत वडिलांचे एक आभासी पात्र तयार करण्यात आले होते, जे वधू-वरांना आशीर्वाद देखील देऊ शकतात. यासोबतच वधू-वर, त्यांचे मित्र आणि नातेवाईक यांचे आभासी अवतारही तयार करण्यात आले. या लग्नाला उपस्थित राहण्यासाठी खऱ्या जगातून आभासी जगात जावे लागेल. जिवंत असताना मृत समाजात (काल्पनिक जगात) सामील होण्याचे निवडणे म्हणजे भ्रमात जगणे किती हास्यास्पद आहे? या तंत्रज्ञानाच्या जगात मृत्यूला नकार देणारे तंत्रज्ञानही उदयास आले आहे. वास्तविक नातेसंबंधांकडे दुर्लक्ष करून आभासी नातेसंबंधांच्या शोधात वास्तविक जीवन सोडण्यास माणूस उत्सुक आहे हे किती मोठे दुर्दैव आहे.

प्रश्न असा आहे की, अशा परिस्थितीत विवाह, कुटुंब, नातेसंबंध आणि समाजाची व्याख्या काय असावी? समाजशास्त्रज्ञांना या व्याख्या पुन्हा कराव्या लागतील. आजचे आभासी जग खरेच समाज आणि कुटुंब संपवण्याची तयारी करत आहे का? लोक अनौपचारिक संस्थांना (कुटुंब, विवाह, नातेसंबंध) इतके कंटाळले आहेत का की त्यांचा या संस्थांवरील विश्वास उडाला आहे, किंवा या सामाजिक संस्था ज्या भूमिका पार पाडण्यासाठी तयार केल्या गेल्या आहेत त्या पूर्ण करण्यात अपयशी ठरत आहेत? समाजशास्त्राच्या संशोधकांनी या प्रश्नांवर संशोधन करण्याची गरज आहे, जेणेकरून त्यामागे दडलेले कारण-परिणाम संबंध शोधून त्या सोडवण्याचा प्रयत्न करता येईल. इथे एक मोठा प्रश्न उभा राहतो की जर कोणी अशा प्रकारच्या तंत्रज्ञानाचा वापर करून कोणतीही कमतरता भरून काढली, तर ती कृत्रिम हृदय, कृत्रिम डोळा, कृत्रिम हात-पाय इत्यादी काही प्रमाणात स्वीकारलेही जाऊ शकते. पण खरा समाज आणि खरी नाती असूनही व्यक्ती आभासी समाज आणि नातेसंबंधांकडे वाटचाल करत असेल, तर ते मानसिक दिवाळखोरीचे लक्षणच म्हणावे लागेल.

त्यामुळे मानवामध्ये नवीन प्रकारचे मानसिक आजार दिसून येत आहेत. सायबरस्पेसने ऑनलाइन व्यक्तिमत्त्व आणि ऑफलाइन व्यक्तिमत्त्वाच्या नवीन वर्गीकरणाला जन्म दिला आहे ज्यामुळे स्किझोफ्रेनियाच्या नवीन स्वरूपाचा जन्म होतो. येथे ऑनलाइन व्यक्तिमत्व वास्तविकतेपासून दूर असलेल्या व्यक्तीचा संदर्भ देते. तो अमर्यादित वेळ ऑनलाइन राहून आपला मौल्यवान वेळ घालवतो आणि सामाजिक जीवनापासून किंवा वास्तविक जीवनापासून अलिप्त होतो आणि तो आभासी जगात आपला सोबती आणि आनंद शोधू लागतो. प्रश्न असा आहे की, आजच्या समाज आणि जीवनातील समस्यांपासून वाचण्यासाठी आभासी जग हा एक चांगला पर्याय असू शकतो का? उत्तर असेल, बहुधा नाही. मग खरा समाज राहण्यायोग्य बनवणे आणि त्यात निर्माण होणाऱ्या आव्हानांना सामोरे जाण्याचे मार्ग शोधणे आवश्यक आहे. समस्या किंवा आव्हानापासून दूर पळणे हा समस्येवरचा उपाय नसून सामूहिकपणे सोडवण्याचा प्रयत्न करणे हाच कायस्वरूपी उपाय असू शकतो.

या तंत्रज्ञानावर आधारित जगाचा भाग बनण्यापासून स्वत:ला थांबवण्याची अजून वेळ आहे. माणसाने तंत्रज्ञानावर नियंत्रण ठेवले तर चांगलं असं म्हणतात, पण तंत्रज्ञान माणसावर नियंत्रण ठेवू लागलं की त्याच्या अस्तित्वालाच आव्हान मिळू लागतं. म्हणूनच व्हर्च्युअल नातेसंबंधांना वास्तविक जग आणि वास्तविक नातेसंबंधांनी बदलण्याची गरज आहे जेणेकरून हा समाज पुन्हा राहण्यायोग्य आणि जगण्यायोग्य होईल.

**-मच्छिंद्र ऐनापुरे**
जत, जि. सांगली

# कृषी दिवस



हरितक्रांतीचे प्रणेते, महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री स्वर्गीय वसंतराव नाईक यांचा आज जन्मदिन. त्यांच्या जन्मदिनानिमित्त आजचा दिवस म्हणजे १ जुलै हा दिवस संपूर्ण राज्यात कृषी दिन म्हणून साजरा केला जातो. त्यांच्यामुळेच देशात हरितक्रांती होऊ शकली. वसंतरावांच्या याच योगदानाची आठवण म्हणून महाराष्ट्र सरकारने १ जुलै हा दिवस कृषी दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला.

राज्यभर हा दिवस वेगवेगळ्या उपक्रमांनी साजरा केला जातो. शेती ही फार पुरातन काळापासून चालत आली आहे. शेती हाच आपला मुख्य व्यवसाय आहे. देशातील सत्तर टक्के लोक शेतीच करतात. राज्यात शिवाजी महाराजांच्या काळात शेतकऱ्याला खूप महत्वाचे स्थान होते. दिवाळीच्या सणाला प्रत्येक घरात शेतकऱ्यांसाठी प्रार्थना केली जायची. ईडा पीडा टळो आणि बळीचे राज्य येवो असा आवाज घराघरांतून ऐकू यायचा. हा आवाज आता कुठे तरी लुप्त होऊ लागला आहे. अनेक सामस्यांनी ग्रासलेल्या शेती आणि शेतकऱ्यांसाठीचा हा आवाज पुन्हा कसा घुमेल यासाठी आजच्या कृषिदिनापासूनच प्रयत्न करायला हवेत.

आज शेतीची आणि शेतकऱ्यांची अवस्था दयनीय आहे. आस्मानी आणि सुलतानी संकटांनी बळीराजा पिचला आहे. शेतकरी हा शब्द बोलायला जेवढा सोप्पा आहे तेवढा सोप्पा नाही. शेती करताना अचानक येणाऱ्या संकटांचा सामना शेतकऱ्यांना करावा लागतो. त्यात बेमौसमी पाऊस, ओला दुष्काळ, कोरडा दुष्काळ, गारपीट, बाजारपेठेतील बाजारभावात होणारी घसरण, शेतीसाठी सावकाराकडून किंवा बँक, पतसंस्था इत्यादींकडून घेतलेले कर्ज परतफेडीची मुदत, निर्यातीत होणारे शासकीय बदल या व अशा सर्व संकटाला शेतकरी सामोरे जात असतो. हवामानात अचानक होणाऱ्या बदलांमुळे शेतीतील पिकांचे नुकसान होते. हजारो - लाखो रुपये खर्च करून शेतकरी आपला शेतीमाल तयार करतो. त्याची काळजी घेतो. पण त्याला त्याच्या कष्टाचे फळ मिळतेच असे नाही. कधी आस्मानी तर कधी सुलतानी संकटांनी बळीराजाचा हातचा घास हिरावला जातो. शासन दरबारीही त्याची दखल घेलती जात नाही. कर्जाच्या ओझ्याखाली आडकून बळीराजा आत्महत्या करतो. महाराष्ट्रासारख्या कृषिप्रधान राज्यात सर्वाधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. शेतकऱ्यांना कोणी वाली नाही अशी भावना शेतकऱ्यांची झाली आहे. हे चित्र बदलायला हवे. पुन्हा एकदा इडा पीडा टळो बळीचे राज्य येवो हा आवाज घराघरांतून घुमायला हवा यासाठी आजच्या कृषिदिनापासून प्रयत्न करायला हवेत. आजच्या कृषी दिवसाच्या निमित्ताने तमाम शेतकरी बांधवांना कृषिदिनाच्या शुभेच्छा!

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# विद्यार्थ्यांच्या उन्नतीसाठी धडपडणारे व्यक्तिमत्त्व : डी. पी. सावंत

नको धर्मकृत्य पैसा खर्चूनिया,
घेण्यासाठी विद्या तोच खर्चा!
स्वतःचा उद्धार करा प्रयत्नाने,
शक्तीने, युक्तीने सुखी व्हावे!!

थोर समाजसुधारक, कर्मयोगी गाडगे महाराज यांनी वरील वचनातून विद्येचे महत्त्व अधोरेखित केले आहे. विद्या ही सर्वदूर पोहोचावी यासाठी फुले दांपत्यासह महाराष्ट्रातील अनेक शिक्षण महर्षी व समाजसुधारकांनी आपले आयुष्य वेचले. उपेक्षितांच्या झोपडीतील अंधार दूर करण्यासाठी ज्ञानरूपी दिवा खूप महत्त्वाचा आहे. हाच विचार केंद्रस्थानी ठेवून मराठवाड्यातील ऐतिहासिक अशा नांदेड नगरीत श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटीचे बिजारोपण झाले. मराठवाड्याचे भाग्यविधाते, देशाचे माजी गृहमंत्री डॉ. शंकरराव चव्हाण यांनी तत्कालीन आपल्या जाणत्या सहकाऱ्यांना सोबत घेऊन श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटीचा विस्तार घडवून आणला.

आज महाराष्ट्राचे लोकनेते, राज्याचे माजी मुख्यमंत्री खासदार अशोकराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली ही संस्था भरभराटीला आली आहे. संस्थेच्या उपाध्यक्षा, माजी आमदार सौ. अमिता चव्हाण यांचे संस्थेच्या उन्नतीकडे विशेष असे लक्ष असते. बदलत्या काळाप्रमाणे आवश्यक तो सकारात्मक बदल घडवून, संस्थेला अद्ययावत ठेवण्यासाठी अपार कष्ट घेणारे संस्थेचे कार्यकुशल सचिव, माजी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री डी. पी. सावंत हे शिक्षणाप्रती समर्पित भाव ठेवून सदैव काम करत असतात.

दोन बोटांनी लिहिण्या बरोबर, दोन हातानी काम करण्याचे सामर्थ्य निर्माण करणे म्हणजे शिक्षण अशी शिक्षणाची व्याख्या करणारे कर्मवीर भाऊराव पाटील हे शिक्षणाला रोजगाराभिमुख करण्यासाठी आयुष्यभर झटत राहिले. हाच कर्मवीर अण्णाचा विचार डोळ्यासमोर ठेवून शिक्षणतज्ज्ञ डी.पी. सावंत यांनी आपल्या संस्थेच्या माध्यमातून रोजगारा-भिमुख शिक्षण देणाऱ्या अनेक शाखा निर्माण केल्या. यामधून हजारो विद्यार्थी शिक्षण घेऊन स्वावलंबी बनत आहेत.

दुरितांचे तीमिर जावो या ब्रिदाने सुरू झालेल्या श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटीला अधिक उंचीवर नेण्यासाठी डी. पी. सावंत हे सातत्याने प्रयत्नरत असतात. शाळा, महाविद्यालयातील अध्ययन-अध्यापन प्रक्रिया अधिक गतिमान व विद्यार्थी केंद्रित



व्हावी यासाठी अध्यापक वर्ग हा बुद्धिमान, आपल्या कार्याप्रती अपार निष्ठा ठेवून प्रामाणिक काम करणारा असला पाहिजे, यावर डी. पी. सावंत यांचा नेहमीच कटाक्ष राहिला आहे.

शिक्षक, प्राध्यापक हे तंत्रज्ञानयुक्त व्हावे यासाठी स्वतः डी. पी. सावंत विविध परिषदा, संवाद मेळावे, तंत्रज्ञान महोत्सव शारदा भवन एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून आयोजित करतात. त्याचबरोबर राज्यात, देशभरात होणाऱ्या विविध तंत्रज्ञान महोत्सवात, प्रशिक्षण सत्रात शारदा भवन मधील अध्यापकांना आवर्जून पाठवतात.

मुंबई येथे २९ व ३० मे २०२६ रोजी पार पडलेल्या कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील जागतिक दर्जाच्या नामांकित मुंबई टेक वीकमध्ये महाराष्ट्रातील अग्रगण्य असणाऱ्या आपल्या श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटीने सहभाग घेतला. संस्थेच्या यशवंत महाविद्यालय व आयटीएम महाविद्यालयाने तसेच लालबहादूर शास्त्री महाविद्यालय धर्माबाद यांनी यामध्ये सहभाग घेतला. या तंत्रज्ञान महोत्सवामध्ये राज्याचे माजी मंत्री आणि संस्थेचे सचिव डी. पी. सावंत यांनी दोन दिवस पूर्णवेळ उपस्थिती राहून सहभाग घेतला.

शिक्षण क्षेत्रात काम करत असताना मानवतावादी दृष्टिकोन जोपासलाच पाहिजे असे ते पोटतिडकीने सांगतात. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे एक वचन या निमित्ताने आठवतं...

मानवता है पथ मेरा,
गिरते को उठाना धर्म मेरा,
एक जात बनाना वर्ग मेरा,
दुहियों को मिटाना स्वर्ग मेरा,
सबकी भलाई कर्म मेरा...

या उच्च प्रतीच्या भावनेने समाजकारण, राजकारण शिक्षण क्षेत्रात काम झाले, तर नक्कीच सामाजिक एकोपा वृद्धिंगत व्हायला मोठी मदत होत असते. हा राष्ट्रसंतांचा विचार डोळ्यासमोर ठेवून वाटचाल करणारे डी. पी. सावंत म्हणूनच सर्वच समाजात लोकप्रिय आहेत.

महाराष्ट्रातील नामांकित म्हणून गणल्या जाणाऱ्या यशवंत महाविद्यालयात २००३ ला जिनियस बॅचची निर्मिती झाली आणि लातूरला जाणारा विद्यार्थ्यांचा लोंढा थांबला. उत्तम व दर्जेदार शिक्षण नांदेडमध्ये मिळेल हा विश्वास त्यावेळी पालकांच्या मनात निर्माण करणे, हे एक आव्हानात्मक काम होते. हे आव्हान यशवंत महाविद्यालयाच्या जिनियस बॅचने लिलया पेलले. ही जिनियस बॅच निर्माण करण्यासाठी त्यावेळी मराठवाड्याचे भाग्यविधाते, श्रद्धेय डॉ. शंकरराव चव्हाण यांचे आशीर्वाद व मार्गदर्शन लाभले. महाराष्ट्राचे लोकनेते, खासदार अशोकराव चव्हाण, माजी आमदार सौ. अमितताई चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेचे सचिव म्हणून डी. पी. सावंत यांनी या जिनियस बॅचच्या निर्मितीसाठी प्रचंड मेहनत घेतली. त्यांच्या सातत्यपूर्ण मेहनत, उत्तम नियोजनातून आणि प्राध्यापकांच्या उत्कृष्ट अध्यापनातून जिनियस बॅचने अप्रतिम निकाल दिला. या जिनियस बॅचमधून हजारो यशवंत घडू लागले. महाराष्ट्रासह देशभरातील नामांकित वैद्यकीय व आभियांत्रिकी महाविद्यालयात यशवंत महाविद्यालयाचे असंख्य विद्यार्थी शिक्षण घेऊ लागले.आज देशासह जगातील अनेक विकसित राष्ट्रात यशवंत कॉलेजमधील जिनियस बॅचचे विद्यार्थी डॉक्टर, इंजिनियर, संशोधक यासह विविध पदावर काम करताना पाहवयाला मिळतात.

समाजकारण, राजकारण, शिक्षण, कला, क्रीडा, संगीत, उद्योग या क्षेत्रात स्वतःच्या कार्याचा अमूल्य ठसा उमटवणारे डी. पी. सावंत हे राजकारणातील अनोखं व्यक्तिमत्व आहे. सामाजिक बांधिलकीची भावना ठेवून अगदी नि:स्वार्थ भावनेने काम करणारे डी. पी. सावंत हे कायमच लोकांच्या आदरस्थानी आहेत.

सेवा, समर्पण, निष्ठा, त्याग व प्रामाणिकपणा यांचा समुच्चय म्हणजे डी. पी. सावंत दोन टर्म नांदेड उत्तर विधानसभेचे आमदार म्हणून त्यांनी केलेली जनसेवा मतदारसंघातील लोकांच्या कायम लक्षात राहण्यासारखी आहे. नांदेड शहराला पिण्याच्या पाण्याची टंचाई भासू नये यासाठी त्यांनी मोठ्या प्रयत्नातून आसना नदीवर पर्यायी पाणी पुरवठा योजना उभी केली. मतदारसंघातील वाडी बुद्रुक येथे पहिली निमशहरी पाणीपुरवठा योजना कार्यान्वित केली.

१७ करोड रुपयाची ही पाणीपुरवठा योजना मराठवाड्यातील एका ग्रामपंचायतीला मिळण्याचे हे पहिलेच उदाहरण होते. त्यासाठी डी. पी. सावंत यांनी प्रचंड मेहनत घेतली. ज्यामुळे आज वाडीसह ३० नगरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमचा मिटला. मतदारसंघात रस्त्याचे जाळे उभे केले.

शेतकऱ्यांना सिंचनाचा योग्य लाभ झाला पाहिजे, यासाठी कॅनालची दुरुस्ती करून घेतली. जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून त्यांनी जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी घेतलेली तळमळ साऱ्या जिल्ह्याने पाहिली आहे. डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला ११० करोड रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला. आरक्षणाचे जनक, लोकराजे छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचा पावडेवाडी नाका परिसरात भव्य पूर्णाकृती पुतळा उभा करण्यासाठी डी. पी. सावंत यांनी प्रचंड मेहनत घेतली. आज हा पूर्णाकृती पुतळा आणि स्मारक नव्या पिढीला प्रेरणा देत आहे. स्त्री शिक्षणाचे उद्गाते राष्ट्रपिता महात्मा जोतीराव फुले आणि आद्य शिक्षिका क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या सुंदर अशा पूर्णाकृती पुतळा उभारणीमध्ये बहुमोल वाटा उचलला. अशी दूरदृष्टी असणाऱ्या नेत्याची समाजकारणात आणि राजकारणात नेहमीच गरज असते.

डी. पी. सावंत यांच्यासारखे अभ्यासू, प्रामाणिक, स्वच्छ प्रतिमा असणारे व्यक्तिमत्व पुन्हा जनतेलाही हवे आहे. येणाऱ्या काळात पुन्हा ते राजकारणात नव्या भूमिकेतून उभारी घेतील यात तीळमात्र शंका नाही. निर्मळ मनाच्या सोज्वळ व्यक्तिमत्त्वाचे अभीष्टचिंतन करताना विधात्याकडे एकच प्रार्थना आहे, की आपणास निरोगी, सदृढ, दीर्घायू, आरोग्य लाभो हीच मनोकामना.

**-प्रा. संतोष देवराये,**
सचिव,
डॉ. शंकरराव चव्हाण शारदा धनवर्धिनी
सहकारी पतपेढी, नांदेड.
मो. ९८६०८२०६५७

# सत्यमेव जयते फार्मर कप २०२६ चा राज्यव्यापी स्पर्धेचा शुभारंभ

## सोयाबीन, तूर आंतरपीक पद्धती आणि कमी कालावधीचे वाण अवलंबण्याचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभाग, उमेद अभियान आणि पाणी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सत्यमेव जयते फार्मर कप २०२६ या राज्यव्यापी स्पर्धेचा शुभारंभ आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मुंबई येथे करण्यात आला. यावेळी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, पाणी फाउंडेशनचे संस्थापक आमीर खान हे हजर होते. मुख्यमंत्री यांनी दृश्य संवाद प्रणालीद्वारे राज्यभरातील शेतकरी व अधिकाऱ्यांशी संवाद साधला.



या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण नांदेड जिल्हा परिषद येथील कै. यशवंतराव चव्हाण सभागृहात करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हा परिषदेचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत, कृषी विकास अधिकारी डॉ. निलकुमार ऐतवडे, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी अवधूत गंजेवार, आत्माचे प्रकल्प उपसंचालक श्रीमती अर्चना गुंजकर, पाणी फाउंडेशनचे प्रवीण काथवटे, उमेदचे जिल्हा अभियान व्यवस्थापक द्वारकादास राठोड, जिल्हा व्यवस्थापक बाळाप्रसाद जंगीलवाड, तालुका कृषी अधिकारी संजय चातरमल, वसंत जारीकोटे, मेंटॉर, सोहेल सय्यद, सहायक तंत्रज्ञान व्यवस्थापक, आत्मा, उपकृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी, सहायक कृषी अधिकारी यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमाला पंचमुखी शेतकरी गट, भूमिपुत्र महिला शेतकरी गट, कृषी शेती महिला गट, संबोधी महिला शेतकरी गट, जय शिवराय शेतकरी गट, अन्नपूर्णा महिला शेतकरी गट यांच्यासह जिल्ह्यातील अनेक महिला व पुरुष शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रारंभी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांनी मार्गदर्शन केले. नांदेड जिल्ह्यात फार्मर कप स्पर्धेअंतर्गत आजपर्यंत ८४१ शेतकरी गटांची बांधनी पूर्ण झालेली असून कृषी विभागाच्या योजनांचा प्राधान्याने लाभ शेतकरी गटांना देण्याचे शासनाचे धोरण असल्याचे त्यांनी सांगितले. फार्मर कप अंतर्गत शेतकरी गटांना आत्मा प्रात्यक्षिकामधून कमी खर्चाची जैव निविष्ठा निर्मिती केंद्रे देणे नियोजित असल्याचे व या गटांना खरीप तसेच रब्बी हंगामातील पीक प्रात्यक्षिकासाठी अर्ज करण्याविषयी कृषी विभाग मार्गदर्शन करीत असल्याचे सांगितले. फार्मर कप गट हे दशपर्णी अर्क, जीवामृत, बीजामृत, प्रक्षीथांबे इत्यादी कमी खर्चाचे लागवड तंत्रज्ञान अवलंब करीत असून भविष्यामध्ये प्रत्येक गावातील कृषी विस्तार कार्याचे नेतृत्व ही गटे प्राधान्याने करणार असल्याचे सांगितले.

मुख्यमंत्र्यांच्या आभासी संवादानंतर जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना यावर्षी एल-निनोच्या प्रभावामुळे कमी पर्जन्यमानाची शक्यता व्यक्त केली. त्यामुळे कमी कालावधीच्या वाणांचा, सोयाबीन तूर आंतरपीक पद्धतीद्वारे शेतीतील जोखीम कमी करण्याचा तसेच कमी पाण्यात अधिक उत्पादन देणाऱ्या पीक पद्धतींचा अवलंब करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. ज्वारी, बाजरी, मूग आणि उडीद यांसारख्या पिकांना प्राधान्य द्यावे. तसेच बेडवर टोकन पद्धतीने लागवड केल्यास बियाण्याची बचत होईल, असे त्यांनी सांगितले.

जिल्ह्यात सध्या मनरेगा अंतर्गत जुन्या विहिरी व बोअरवेलचे पुनर्भरण सुरू असून आतापर्यंत सुमारे ३० लाख घनमीटर तलावातील गाळ काढण्यात आला आहे. तसेच ८४ किलोमीटर नाला सरळीकरणाची कामे पूर्ण झाल्याची माहिती त्यांनी दिली. नाल्यांच्या काठावर बांबू लागवड करण्यासह जलसंधारण उपक्रमात लोकसहभाग वाढवण्याचे आवाहनही त्यांनी केले.

कृषी विभाग, उमेद अभियान आणि पाणी फाउंडेशन यांच्या माध्यमातून जिल्ह्यात ८८१ शेतकरी गटांची उभारणी करण्यात येत असून उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या गटांना बायोलॅब प्रकल्प उपलब्ध करून देण्याचा मानस व्यक्त करण्यात आला.

यावेळी शेतकऱ्यांनी युरिया खताचा अतिरेक टाळून रासायनिक खतांचा वापर कमी करावा, नैसर्गिक शेतीला प्राधान्य द्यावे तसेच घरगुती बियाणे जतन करून त्यांचा पेरणीसाठी वापर करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले. तर पाणी फाउंडेशनचे प्रवीण काथवटे यांनी शेतकरी गटांच्या उपक्रमांची माहिती दिली.

सौ. सुमनबाई दिगंबर गायकवाड मु. पो. भोसी ता. भोकर जि. नांदेड यांची उद्यान पंडित पुरस्कार २०२३, गोविंद बाबुराव शिंनगारे मु. पो. बिजूर ता. बिलोली जि. नांदेड यांची वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार (सर्वसाधारण गट ) २०२३ व विश्वनाथ गोविंदराव होळगे मु. पो. दापशेड ता. लोहा, जि. नांदेड यांची कृषीभूषण (सेंद्रिय शेती) २०२४ पुरस्कारासाठी निवड झाल्यामुळे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# हदगाव तालुका अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय किनवटला जोडू नका

## भारतीय जनता पार्टीच्यावतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन



**नांदेड (प्रतिनिधी)–** किनवट येथे प्रस्तावित होत असलेल्या अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात हदगाव तालुक्याचा समावेश करू नये, या मागणीसाठी भाजपाचे हदगाव तालुकाध्यक्ष भागवत देवसरकर, सूर्यकांत हनवते, प्रदेश कार्यकारिणी सदस्य चंद्रशेखर पाटील कोळीकर यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी नांदेड यांना सविस्तर निवेदन देण्यात आले आहे. यावेळी हदगावचे आमदार बाबुराव कदम कोहळीकर, पंचायत समितीचे माजी सभापती बाळासाहेब कदम उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी नांदेड यांना दिलेल्या निवेदनात हदगाव तालुका भौगोलिकदृष्ट्या नांदेडपासून केवळ ४५ किमीवर आहे. तर किनवटचे अंतर ११० ते १२० किमी असून प्रवासाला ३ ते ४ तास लागतात. त्यामुळे शेतकरी, महिला, वयोवृद्ध आणि दिव्यांग नागरिकांना महसुली कामांसाठी मोठी गैरसोय होणार आहे, असे म्हटले आहे.

हदगाव तालुका प्रशासकीय, सामाजिक व भौगोलिकदृष्ट्या नांदेड जिल्हा मुख्यालयाशी संलग्न आहे. जिल्हाधिकारी कार्यालय, न्यायालय, सामान्य रुग्णालय यासह सर्व जिल्हास्तरीय कार्यालये नांदेड येथेच आहेत. त्यामुळे नागरिकांची सर्व प्रकारची ये-जा नांदेडलाच होते.

हदगावला किनवटशी जोडल्यास तालुक्यातील जनतेमध्ये तीव्र नाराजी आहे. त्यामुळे हदगाव तालुका पूर्वीप्रमाणेच जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड अंतर्गतच कायम ठेवावा आणि भविष्यात हदगाव येथेच उपविभागीय स्तरावर सुविधा वाढवाव्यात, अशी मागणी भाजपचे चंद्रशेखर पाटील कदम, तालुकाध्यक्ष भागवत देवसरकर, सूर्यकांत हनवते यांनी केली आहे.

# माऊलींच्या नामघोषात नरसीच्या दिंडीचे २ जुलैला होणार पंढरपूरकडे प्रस्थान; भाविकांना सहभागी होण्याचे आवाहन

**नायगाव बाजार (प्रतिनिधी)–** नरसी येथील श्रीराम मंदिर देवस्थानच्या वतीने आयोजित पारंपरिक आळंदी-पंढरपूर पायी दिंडी सोहळ्याचे प्रस्थान गुरुवार, दि. २ जुलै रोजी होणार आहे. विठ्ठलनामाच्या अखंड गजरात आणि भक्तिमय वातावरणात निघणाऱ्या या दिंडीत सहभागी होण्यासाठी परिसरातील वारकरी, टाळकरी व भाविकांना आवाहन करण्यात आले आहे.



दिंडी प्रस्थानापूर्वी सकाळी ११ वाजता गुरुपूजन, वारीचे महत्त्व विशद करणारे प्रवचन, आरती आणि महाप्रसादाचा कार्यक्रम होणार आहे. त्यानंतर सद्गुरूंच्या हस्ते दिंडी पंढरपूरच्या दिशेने मार्गस्थ होईल. वारीपूर्वी परळी वैजनाथ, पैठण, नेवासा, शनिशिंगणापूर, शिर्डी, नाशिक, त्र्यंबकेश्वर, भीमाशंकर, देहू आणि आळंदी या प्रमुख तीर्थक्षेत्रांचे दर्शन घेण्याचीही व्यवस्था करण्यात आली आहे.

दिंडीतील प्रत्येक दिवस हरिनामाच्या गजराने भारलेला असणार आहे. हरिपाठ, नामस्मरण, भजन, कीर्तन, प्रवचन आणि भारूड यांच्या माध्यमातून संत परंपरेचा विचार जनमानसापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला जाणार असून, विविध भागांतील नामवंत कीर्तनकार आणि प्रवचनकार यांची उपस्थिती लाभणार आहे.

# शासकीय तंत्रनिकेतन येथे मुलाखतीचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)–** शासकीय तंत्रनिकेतन नांदेड या संस्थेत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या विषम/सम सत्राकरिता स्थापत्य अभियांत्रिकी, विद्युत अभियांत्रिकी, यंत्र अभियांत्रिकी, उत्पदान अभियांत्रिकी, माहिती तंत्रज्ञान, वैद्यकीय अणुविद्युत, अणुविद्युत, विज्ञान विभाग (गणित व रसायनशास्त्र) व उपयोजित यंत्रशास्त्र विभागातील विषयातील तासिका तत्त्वावर अभ्यागत अध्यापकांची नेमणूक करावयाची आहे.

इच्छुक उमेदवारांनी ७ जुलै २०२६ रोजी मुलाखतीसाठी संस्थेच्या संबंधित विभागात सकाळी ११ वाजता मूळ शैक्षणिक कागदपत्रे व दोन छायांकि त प्रतीसह उपस्थित राहावे, असे आवाहन शासकीय तंत्रनिकेतन नांदेडचे प्राचार्य यांनी केले आहे.

# भारतीय जनता पार्टीच्या पदाधिकाऱ्यांनी पक्ष संघटना मजबूत करत सजग राहिले पाहिजे –प्रदेश सरचिटणीस सुनील राणे

**नांदेड (प्रतिनिधी)–** भारतीय जनता पार्टीच्या बुथ पातळीवरील कार्यकर्त्यांनी बीएलओ २ म्हणून अत्यंत सजग राहिले पाहिजे, असे प्रतिपादन भाजपा प्रदेश सरचिटणीस सुनील राणे यांनी केले.




हदगाव येथे भारतीय जनता पार्टी हदगाव विधानसभा बीएलओ २ संघटनात्मक आढावा बैठक भर पावसातही मोठ्या उत्साहात संपन्न झाली. या बैठकीला प्रमुख मार्गदर्शक म्हणून भाजपा प्रदेश सरचिटणीस सुनील राणे उपस्थित होते.

यावेळी बोलताना सुनील राणे म्हणाले की, लोकशाहीचा पाया मतदार यादी आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक बुथवर बीएलओ २ ने मतदार यादीतील नावांची अचूक तपासणी करणे, नवीन मतदारांची नोंदणी करणे आणि अपात्र नावे कमी करणे या कामाला प्राधान्य द्यावे. गाव तिथे कमळ, बुथ तिथे भाजपा हा संकल्प घेऊन प्रत्येक कार्यकर्त्याने घरोघरी जाऊन महायुती सरकारच्या विकासकामांची माहिती पोहोचवावी, असे आवाहन त्यांनी केले. भर पावसातही कार्यकर्त्यांची मोठी गर्दी पाहून राणे यांनी हदगाव भाजपचे संघटन कौशल्याचे विशेष कौतुक केले.

या बैठकीच्या अध्यक्षस्थानी मराठवाडा संयोजक नितीन काळे होते. व्यासपीठावर नांदेड उत्तर प्रभारी किरण पाटील, माजी जिल्हाध्यक्ष सुधाकरराव भोयर, नांदेड उत्तर जिल्हाध्यक्ष किशोर देशमुख, चंद्रशेखर कदम कोळीकर, डॉ. राजेंद्र वानखेडे, जिल्हा सचिव तातेराव वाकोडे, दादाराव टिप्परसे, शिरीष मनाथकर, हदगाव पूर्व मंडळाध्यक्ष भागवत देवसरकर, पश्चिम मंडळाध्यक्ष सूर्यकांत हानवते, शहर मंडळाध्यक्ष बाळा पाटील, हिमायतनगर मंडळाध्यक्ष गजानन चाऐल आदी मान्यवर उपस्थित होते.

# जिल्हा परिषदेत आज कृषी दिनाचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)–** माजी मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांनी कृषिक्षेत्रात केलेल्या भरीव योगदानाबद्दल १ जुलै हा दिवस त्यांचा वाढदिवस राज्यात कृषिदिन म्हणून साजरा करण्यात येतो. यावर्षी १ जुलै २०२६ रोजी जिल्हा परिषदेच्या कृषी विभागामार्फत कृषिदिन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक संदीप माळोदे यांच्या अध्यक्षतेखाली कै. यशवंतराव चव्हाण सभागृह, जिल्हा परिषद, नांदेड येथे साजरा करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमात सेंद्रीय शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रमाणपत्र वाटप करण्यात येणार आहेत. या कार्यक्रमासाठी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, विद्यापीठ शास्त्रज्ञ, जिल्हा परिषदेचे अधिकारी व कर्मचारी, कृषी विभाग महाराष्ट्र शासन, आत्मा नांदेडचे सर्व अधिकारी व कर्मचारी तसेच जिल्ह्यातील राज्य पुरस्कार प्राप्त शेतकरी, शेती क्षेत्रात उल्लेखनीय काम करणारे शेतकरी व महिला, शेंद्रीय शेती करणारे शेतकरी, माध्यम प्रतिनिधी, पत्रकारांची उपस्थिती राहणार आहे.

# एमजीएममध्ये राजर्षी शाहू महाराज जयंती साजरी



**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील एमजीएम अभियांत्रिकी महाविद्यालयात महाविद्यालयाच्या संचालिका डॉ. गीता लाठकर यांच्या मार्गदर्शनात राजर्षी शाहू महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. शिरिष कोटगीरे यांनी शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी डॉ. गोविंद हंबर्डे, प्रथमवर्ष अभियांत्रिकी प्रमुख प्रा. नारायण कदम, इलेक्ट्रॉनिक टेलिकम्युनिकेशन विभागातील वरिष्ठ प्रा. विठ्ठल जाधव, ग्रंथालय सहायक आकाश तेलंग, सुरक्षा रक्षक बालाजी गुडवे आदींसह शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

कोल्हापूर संस्थानाचे महान राजे बहुजन समाजाचे उद्धारक आणि सामाजिक न्यायाचे प्रणेते राजर्षी शाहू महाराज यांचा जन्मदिवस महाराष्ट्रात 'सामाजिक न्याय दिन' म्हणूनही साजरा केला जातो. शाहू महाराजांनी बहुजन गरिबांसाठी वसतिगृहे सुरू केली आणि मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण दिले. अस्पृश्यता निवारणासाठी काम केले, देवदासी प्रथा बंद केली आणि स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार मिळवून दिला असल्याचे मान्यवरांनी विचार व्यक्त करताना सांगितले.

# ८५-भोकर विधानसभा मतदारसंघ विशेष पुनर्निरीक्षण कार्यक्रमाची कार्यशाळा

## मतदारांना 'गणना फॉर्म' भरण्याचे तहसीलदार विनोद गुंडमवार यांचे आवाहन

**भोकर (प्रतिनिधी)–** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार आणि जिल्हाधिकारी राहुल कर्डिले व उपविभागीय अधिकारी तथा भोकरचे मतदार नोंदणी अधिकारी प्रवीण मेंगशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली ८५-भोकर विधानसभा मतदारसंघांतर्गत विशेष पुनर्निरीक्षण कार्यक्रमाची कार्यशाळा दि. २८ जून रोजी 'गणराज रिसॉर्ट' भोकर येथे पार पडली.




या कार्यशाळेला तालुक्यातील सर्व राजकीय पक्षांचे प्रमुख, नगरसेवक, बीएलओ, बीएलए आणि पर्यवेक्षक अशा सुमारे ४०० ते ५०० प्रतिनिधींची उपस्थिती होती. यामध्ये भाजपचे दिवाकर रेड्डी, शिवसेना (शिंदे गट) चे माधव वडगावकर, शिवसेना (उबाठा) चे संतोष आलेवाड, आरपीआयचे जयभीम पाटील, प्रहारचे शेखर कुंटे, आम आदमी पार्टीचे सय्यद अलमास, नगराध्यक्ष भगवानराव दंडवे, उपनगराध्यक्ष दिलीप सोनवडे, बीएलए-१ चे रामचंद्र मुसळे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यशाळेत सविस्तर मार्गदर्शन करताना तहसीलदार विनोद गुंडमवार यांनी मतदारांना आवाहन केले की, ३० जून २०२६ ते २९ जुलै २०२६ या कालावधीत आपल्या गावातील बीएलओ प्रत्यक्ष घरोघरी येऊन 'गणना फॉर्म' वितरित करतील. मतदारांनी या फॉर्ममधील माहितीची खात्री करावी आणि त्यावर स्वाक्षरी करून दिनांक नमूद करावा. या मोहिमेत सहभागी होण्यासाठी प्रत्येक मतदाराने नजीकच्या काळात आपला एक पासपोर्ट फोटो, जन्म दिनांक, आधार क्रमांक, पती/पत्नी किंवा आई-वडिलांचे नाव, ओळखपत्र क्रमांक आणि मोबाईल क्रमांक यांसारखी आवश्यक माहिती बीएलओला देण्यासाठी तयार ठेवावी.

ज्या मतदारांचे मॅपिंग अद्याप झालेले नाही, त्यांनी २००२ च्या मतदार यादीतील तपशील शोधून ठेवावा. जर नाव २००२ च्या यादीत नसेल, तर आपल्या कुटुंबातील व्यक्तींच्या (आई-वडील, आजी-आजोबा) २००२ मधील तपशीलाच्या आधारे संबंधित बीएलओकडे मॅपिंग पूर्ण करून घ्यावी. जे मतदार गणना फॉर्म भरून देणार नाहीत, त्यांची नावे प्रारूप मतदार यादीतून वगळली जाऊ शकतात, असा इशाराही त्यांनी दिला.

मतदारांना हा फॉर्म 'व्होटर हेल्प पोर्टल'द्वारे ऑनलाईन भरण्याची सुविधाही उपलब्ध आहे. कार्यशाळेसाठी निवडणूक विभागाचे नायब तहसीलदार रामेश्वर सावते, कर्मचारी पेशकार शेळके, संगणक चालक संजय सूर्यवंशी आणि साई जोगळेकर यांनी परिश्रम घेतले. लोकशाही बळकट करण्यासाठी सर्व मतदारांनी या प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन निवडणूक विभाग व प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# भारतीय बौद्ध महासभेच्यावतीने समता सैनिक दलाचे शिबीर संपन्न



**लोहा (प्रतिनिधी)–** भारतीय बौद्ध महासभा तालुका शाखा लोहाच्या वतीने दि. २७ जून २०२६ रोजी क्रांतीसूर्य बुद्ध विहार या ठिकाणी समता सैनिक दलाचे एक दिवसीय समता सैनिक दलाचे शिबीर संपन्न झाले.

या एक दिवशीय समता सैनिक दलाच्या शिबिराचे उद्घाटन जिल्हा सरचिटणीस रत्नाकर महाबळे यांच्या हस्ते भगवान बुद्ध, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुष्प पूजा व समता सैनिक दलाचे ध्वजाचे ध्वजारोहण करून करण्यात आले.

या शिबिरासाठी प्रशिक्षक म्हणून समता सैनिक दलाचे उपाध्यक्ष मेजर कर्नल संतोष दुंडे यांनी कार्य केले. या प्रशिक्षणात ३५ शिबिरार्थी यांनी सहभाग नोंदवला. यावेळी जिल्हा संरक्षण सचिव भीमराव पवार, डिव्हिजन ऑफिसर विलास सोनकांबळे, जिल्हा सचिव आनंद गोडबोले, संघटक सुभाष खाडे, तालुकाध्यक्ष बापूसाहेब कापुरे, सरचिटणीस धोंडीबा यानभुरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

# अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाच्यावतीने आ. अमर राजूरकर यांचा सत्कार




**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत निवडून आल्याबद्दल आमदार अमर राजूरकर यांचा अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

नांदेड भाजपा महानगराध्यक्ष आ. अमर राजूरकर हे विधान परिषदेवर बहुमताने विजयी झाल्याबद्दल अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाचे प्रदेशाध्यक्ष तथा राष्ट्रीय कार्याध्यक्ष देविदासराव बसवदे, अखिल शिक्षक संघटनेचे राज्य उपाध्यक्ष फारूक बेग, अखिल शिक्षक संघटनेचे सल्लागार तथा केंद्रप्रमुख जयवंतराव काळे, चंद्रकांत दामेकर, सल्लागार नारायण पेरके, नंदेवाड, शिक्षण सहकारी पतसंस्थेचे संचालक सुधाकर थडके, सहकारी पतसंस्थेचे व्हाईस चेअरमन माणिकराव कदम, अखिल शिक्षक संघटनेचे जिल्हा सरचिटणीस दत्तात्रय धात्रक, पदोन्नत मुख्याध्यापक बळीराम राठोड, अखिल शिक्षक संघटनेची उपसरचिटणीस जी. टी. कदम, श्रीराम सहकारी पतसंस्थेचे चेअरमन तथा विद्यमान संचालक गणेश पाटील कदम, यशवंत कर्मचारी सहकारी पतसंस्थेचे व्हाईस चेअरमन अनिल दुगाने, यशवंत कर्मचारी सहकारी पतसंस्थेचे संचालक दत्ताजी पांचारे, किशोर नरवडे, समता विकास सहकारी पतसंस्थेचे व्हाईसचेअरमन सुभाष पाईकराव, मुदखेड तालुका सरचिटणीस शिवाजीराव बामणीकर, अखिल शिक्षक संघटनेचे नेते गुणवंतराव सोळंके उपस्थित होते.

# कवळे पती-पत्नीचे जिल्हा बँकेसाठी नामांकनपत्र दाखल



**उमरी (प्रतिनिधी)–** उमरी तालुका सेवा सहकारी सोसायटी मतदार संघातील प्रतिनिधी पदासाठी दि. २९ जून रोजी उद्योजक मारोतराव कवळे गुरुजींनी सेवा सहकारी सोसायटी मतदारांकरिता त्यांचे नामांकनपत्र जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत निवडणूक अधिकारी यांचेकडे दाखल केले.

सदरील नामांकन पत्र दाखल करताना दत्ताहारी पाटील चोळाखेकर, श्रीहरी देशमुख, रविंद्र पोतगंटीवार, पिराजी पाटील, श्यामराव पाटील चोळाखेकर, शिवाजीराव पाटील बाभुळगावकर, विठ्ठलराव पाटील, शिवराज गाडीवान, सूर्यकांतराव पाटील जुन्नीकर, अशोक पाटील वडजे, श्रीराम जगदंबे, चंदू पाटील, माजी नगराध्यक्ष संजय कुलकर्णी, सुभाष पेरेवार, श्रीनिवास अनंतवार, डॉ. विक्रम देशमुख, बापुसाहेब कौडगावकर, बाळासाहेब पवार हातनीकर, मल्लिकार्जुन चंदापुरे, अनिल वडजे, संदीप कवळे, आनंद चव्हाण यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, देगलूर जि. नांदेड**
**ई-निविदा सुचना क्र. ०२ सन २०२६-२७ (फेरनिविदा)**

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, देगलूर जि. नांदेड (दुरध्वनी) क्रमांक ०२४६३-२५५१११ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून नांदेड जिल्ह्यातील एकूण ०२ कामाकरीता ब-१ नमुन्यातील ई-निविदा (ऑनलाईन) प्रणालीद्वारे मागविण्यात येत आहे.

टीप- १) निविदा कागदपत्राचा तपशिल महाराष्ट्र शासनाच्या ई-टेंडरींग संकेतस्थळ https://mahatenders.gov.in/ आणि www.mahapwd.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

२) सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर कळविण्यात येईल.

३) निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, देगलूर जि. नांदेड यांना राखून ठेवला आहे.

**स्वाक्षरीत/-**
**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**देगलूर जि. नांदेड**

निरोगी आरोग्याचा कानमंत्र

# निरामय

लोक पावसाळ्याचा आनंद घेत असताना तुम्ही का आहात निराश?

## साथीचे आजार अन् उपाय

एकाच गावात राहणाऱ्या बऱ्याच लोकांना जेव्हा एकच आजार होतो, तेव्हा त्या आजाराला साथीचा आजार म्हटले जाते. एकेकाळी अशा साथीच्या आजारांना तोंड देताना मृत्युमुखी पडावे लागल्याची अनेक उदाहरणे असत. पण, वैद्यकीय शास्त्राच्या प्रगतीनंतर अशा साथीच्या रोगांची कारणे समजू लागली आणि त्यावर उपायही होऊ लागले. साथीचे रोग त्या भागातील दूषित पाण्यामुळे होतात, डासांमुळे, कुत्र्यांमुळे किंवा उंदरांमुळे पसरतात किंवा आजार झालेला रुग्ण दुसऱ्या व्यक्तीच्या संपर्कात आल्याने पसरल्याचे ऐकिवात आहे.



पावसाळ्यात अनेक आजार उद्भवतात. मात्र, हाच पावसाळा सरला की उकाडा वाढतो, असह्य होतो. मधूनच अवकाळी पावसाची एखादी सर बरसते आणि साथीचे विषाणूजन्य आजार आणि हिवताप आपले बस्तान बसवतात. गेल्या काही वर्षांत डेंग्यूचा प्रादुर्भाव वाढला म्हणा किंवा शास्त्रात प्रगती झाल्यामुळे डेंग्यू व इतर विषाणूजन्य आजारांचे अचूक निदान व रक्ताच्या तपासणीत बिंबिका मोजणे अधिक सोपे होऊ लागले म्हणा. त्यातच भरीसभर आपण रहिवाशांनी व प्रशासनाने, शहरीकरण व सुधारणांच्या नावाखाली निवासाच्या ठिकाणी केलेला चिखल, दलदल व पर्यावरणाचा नाश. या सगळ्या गोष्टींमुळे डेंग्यूच्या रुग्णांची संख्या हल्ली वाढलेली दिसते. घरात डेंग्यू, हिवताप व इतर संसर्गजन्य आजाराचे रुग्ण असतील तर त्यांची माहिती नगरपालिका प्रशासनाला कळवणे, डॉक्टरांना जसे बंधनकारक असते, बहुतेक तसेच डेंग्यूच्या रुग्णांच्या हितचिंतक व नातेवाइकांना, डॉक्टरांनी दिलेल्या औषधांखेरीज, बिंबिका (प्लेटलेट्स) वाढवणारे घरगुती इलाज करणेही तितकेच महत्त्वाचे असते. या घरगुती उपायांमध्ये रुग्णांना पपई, किवीची फळे, पपईच्या झाडांची कोवळी पाने, बाजारात नव्याने शिरकाव करती झालेली लक्ष्मणफळे व मारुती फळे प्रमुख होत. आजाराची साथ व घरगुती उपायांच्या हव्यासापायी कित्येक पपईची झाडे, पाने व फळे तोडली गेल्यामुळे भकास होतात, कालांतराने खुंटतात वा जीवास मुकतात. अनेकदा या वाढत्या साथींबरोबर बाजारातील किवी फळांची किंमतही अकारण वाढते. बऱ्याचदा ती फळेच बाजारातून अदृश्य होतात. पपईच्या पानांच्या रसामुळे कित्येक रुग्णांना पोटातील आम्लता वाढल्यामुळे उलट्या होतात. बिंबिका कमी झाल्या असल्याने उलट्या होणे म्हणजे पोटातील अंतर्गत रक्तस्त्रावाला आमंत्रण देणे ठरते. तात्पर्य या आजारांवर अतिउत्साहाने कोणतेही घरगुती उपाय करण्यापूर्वी डॉक्टरी सल्ला घेणे आवश्यक आहे. डेंग्यू व तत्सम आजारांच्या बाबतीत, साधारण अडीच ते तीन दिवस बराच ताप येतो, तो ताप उतरतोही. मात्र नंतर पांढऱ्या रक्तपेशी व प्लेटलेट्स कमी व्हायला सुरुवात होते, अशक्तपणा येतो. आजारानंतरचा अशक्तपणा तर अतिशय तीव्र असतो. त्या थकव्यातून बाहेर येण्यास रुग्णांना एखादा आठवडा लागतो. पण ताप उतरला की रुग्णाची व त्यांच्या घरातील मंडळींना, त्यांचे दैनंदिन व्यवहार लवकरात लवकर चालू करण्याची घाई होते. नोकरीच्या ठिकाणी कामावर रुजू होणे तसेच मुलांना शाळेत पाठवणे याची लोकांना निकड वाटते. परंतु शाळेत वा कामाच्या ठिकाणी रुजू झाल्यावरही थकवा जाणवत असल्याने कित्येक जण घरी परत येतात. विषाणूजन्य साथीचे आजार व हिवताप गेल्यानंतरही घाई न करता घरी पुरेशी विश्रांती घेऊन नंतरच शाळेत अथवा नोकरीच्या ठिकाणी रुजू होणे योग्य ठरेल. डासांमुळे होणारे आजार साथीचे असले तरी एका व्यक्तीकडून दुस*या व्यक्तीला संसर्ग करत नाहीत. हे आजार पसरण्यासाठी डासांची गरज असते. पण वरील गैरसमजामुळे या रुग्णांना अकारण वेगळे ठेवले जाते. साथीच्या व हवामान बदलामुळे होणाऱ्या श्वसनविकारांत हवेतील प्रदूषणाचा मोठा वाटा असतो. आपण पाणी उकळवून व गाळून निर्जंतुक करू शकतो. मात्र तशी खिडक्यादारे लावून व धुळीचा बंदोबस्त करून, हवा निर्जंतुक करता येत नाही. परिणामी, परिसरातील प्रदूषण सर्व प्रतिबंधक उपाय करूनही आपल्याला त्रास देतेच. त्यामुळे व्यक्तिगत स्वच्छतेसोबत, परिसर स्वच्छताही तितकीच महत्त्वाची आहे. खाद्यपदार्थांतून होणाऱ्या आजारांच्या बाबतीत, लोकांचा गैरसमज असा की, शीतकपाटातील बर्फात ठेवलेले पदार्थ निर्जंतुक राहतात आणि ते पदार्थ उकळल्यावर किंवा गरम केल्यावर खाण्यायोग्य निर्जंतुक होतात. या गैरसमजापोटी पादूषित पदार्थ खाल्ले व प्यायले जातात आणि हेच आजारांना आमंत्रण ठरते. आजारांच्याबाबत असलेल्या समज व गैरसमजाबद्दल डॉक्टर वा अधिकृत माहितीच्या स्त्रोताद्वारे (सोशल मीडिया नव्हे) आपल्या शंकांचे निरसन करावे.

## मान्सून ब्लूज

**एकीकडे पावसाळा ऋतू थंड वारा आणि पावसाच्या थेंबांनी दिलासा देतो, तर दुसरीकडे अनेक लोकांसाठी हा ऋतू दुःख, थकवा आणि तणावाचे कारण बनतो. जर तुम्हाला पावसाळ्याच्या दिवसात मूड स्विंग, निद्रानाश किंवा उर्जेचा अभाव जाणवत असेल, तर तुम्हाला मान्सून ब्लूजचा त्रास होत असेल.**

डॉक्टरांच्या मते, मान्सून ब्लूज हा प्रत्यक्षात एक प्रकारचा हंगामी भावनिक विकार (एसएडी) आहे, जो ऋतू बदलाबरोबर होतो. सूर्यप्रकाशाचा अभाव, आर्द्रता आणि तापमानातील चढउतारांमुळे असे होऊ शकते. पण काळजी करण्याची गरज नाही, कारण काही सोप्या सवयी बदलून तुम्ही यापासून मुक्त होऊ शकता. डॉक्टरांच्या मते, झोपेच्या पद्धती, आहार आणि व्यायामात छोटे बदल करून तुम्ही पावसाळ्याच्या काळातील निराशेवर मात करू शकता. या ऋतूतही तुम्हाला ताजेतवाने आणि सकारात्मक ठेवणाऱ्या ५ महत्त्वाच्या टिप्स जाणून घ्या...

### मान्सून ब्लूज म्हणजे काय?

मान्सून ब्लूज हा एक प्रकारचा भावनिक त्रास आहे जो पावसाळ्यात होतो. त्याची लक्षणे म्हणजे दुःख, चिडचिड, निद्रानाश, भूक न लागणे आणि कमी ऊर्जा पातळी. जर तुम्हाला ही लक्षणे काही आठवडे जाणवत राहिली तर ती नेहमीपेक्षा जास्त गंभीर असू शकते.

### व्हिटॅमिन डी घ्या

पावसाळ्यात सूर्यप्रकाश कमी असतो, ज्यामुळे व्हिटॅमिन डीची कमतरता निर्माण होते. त्यामुळे तुम्हाला थकवा जाणवतो. हे टाळण्यासाठी, सकाळी १५-२० मिनिटे उन्हात बसा आणि अंडी, मासे आणि दूध यासारखे व्हिटॅमिन डी समृद्ध पदार्थ घ्या.

### आहारात या गोष्टींचा समावेश करा

पावसाळ्यात ओमेगा-३ फॅटी ॲसिड (अक्रोड, जवस बियाणे), डार्क चॉकलेट आणि केळी असलेले पदार्थ खा. हे सेरोटोनिन हार्मोन वाढवतात. ज्यामुळे मूड सुधारतो. या हंगामात गरम सूप आणि हर्बल टी हे देखील चांगले पर्याय आहेत.

### व्यायाम अन् योगाने ताण कमी

बाहेर जाऊन चालणे कठीण असेल तर घरी योगा, स्ट्रेचिंग किंवा डान्स करा. प्राणायाम आणि ध्यान हे देखील ताण कमी करण्यास मदत करतात. दररोज फक्त २० मिनिटे व्यायाम केल्याने तुम्हाला ऊर्जा मिळू शकते.

### रात्री लवकर झोपा...


पावसाळ्यात आर्द्रतेमुळे झोपेच्या गुणवत्तेवर परिणाम होतो. रात्री लवकर झोपण्याची आणि सकाळी लवकर उठण्याची सवय लावा. झोपण्यापूर्वी कोमट दूध किंवा कॅमोमाइल चहा प्यायल्याने चांगली झोप येते.

### समाजात मिसळा, एकटेपणा टाळा

लोक बहुतेकदा त्यांच्या घरातच राहतात, ज्यामुळे एकटेपणा आणि नकारात्मकता वाढते. मित्र आणि कुटुंबियांसोबत व्हिडिओ कॉल करून किंवा इनडोअर गेम खेळून स्वतःला सक्रिय ठेवा.

## पावसाळ्यातील त्वचाविकार !

**पावसाळ्यामध्ये हवेतील आर्द्रतेमुळे त्वचेचे आजार होण्याची शक्यता अधिक असते. ओलाव्यामुळे अनेकदा त्वचेला संसर्गही होतो. साध्या पुरळ उठण्यापासून ते त्वचेवर चट्टे उमटण्यापर्यंत अनेक त्वचाविकारांची लागण पावसाळ्यात होते. कपडे ओले, दमट राहिल्यानेही पावसातील त्वचाविकारांमध्ये भर पडते. पावसाच्या पाण्यात भिजल्यामुळे त्वचा ओलसर राहते. अशावेळी त्वचेवरच्या बुरशीला वाढीसाठी पोषक वातावरण मिळते. त्यामुळे त्वचेला खाज येणे तसेच गोल रिंगच्या आकाराचे चट्टे उठणे आदी समस्या उद्भवतात. लाल चट्टे मुख्यतः जांघेत, ओटीपोटावर, काखेत, दिसतात. या आजाराला वैद्यकीय भाषेत टिनिया कॉर्पोरीस व शरीरावरच्या घड्यामध्ये आढळल्यास टीनिया क्रुरीस असं म्हटलं जातं.**



### पावसाळ्यात या गोष्टी टाळायलाच हव्यात...

- केमिस्टने दिलेली क्रीम परस्पर लावू नका.
- त्वचेची आग होणे, कंड सुटणे तक्रार असेल तर जखम होईस्तोवर खाजवू नका.
- नखं लावून जखमा चिघळवू नका.
- ओले कपडे खूप वेळ अंगावर बाळगू नका.
- जिन्ससारखे खूप काळ अंगावर फिट्ट बसणारे कपडे घालणे टाळा.
- पायांना जखमा असतील तर फ्लोटर्स वा स्लिपर्सचा वापर टाळा.
- ओल्या चपलांमुळे पायाला होणारे आजार बळावतात, पायात सॉक्स घालू नका.
- रसायनांचा तीव्र वापर केलेला साबण टाळा.
- मधुमेह असेल तर या काळात रक्ततपासणी करणे टाळू नका.

- कॅन्डिडीयासिस : शरीरावरच्या घड्यांमध्ये हा आजार आढळतो. साहजिक आहे की, घड्यांमध्ये घाम जास्त सुटतो. या भागांमध्ये घर्षणाचं प्रमाणही जास्तीच असतं. पावसाळ्यात त्वचा दमट राहिल्यामुळे हा आजार निर्माण करणाऱ्या बुरशीची वाढ होते. मग जांघेतला, काखेतला लालपणा आणि खाज वाढते. अनेकदा खाजवून खाजवून जखमाही होऊ शकतात. तसेच जर ती जागा अस्वच्छ असली तर, खाजवून पू भारलेले फोडही निर्माण होऊ शकतात. पायांच्या किंवा हातांच्या बोटांमध्ये जेव्हा ही बुरशी वाढते, तेव्हा आपण चिखल्या झाल्या आहेत, असं म्हणतो. बोटांमध्ये खोलगट आणि पांढरट खड्डा निर्माण होतो, ज्यात कंड सुटू शकतो व कधी कधी वेदनाही होऊ शकतात. पुरुषांमध्ये शिश्नमुंडाचा व त्याच्या टोकाचा दाह जो होतो त्याचं मुख्य कारण कॅन्डीडीयासिस आहे. डायबेटीसच्या आजाराशी कॅन्डीडीयासीसचं इतकं घट्ट नातं आहे की ज्या लोकांना हा त्रास सतत होत राहतो, त्यांच्या रक्त तपासणीत हमखास डायबेटीसचं निदान होतं.
- जीवाणूंचे संक्रमण : बुरशी त्वचेचा दाह निर्माण करते, तसेच त्वचेवर सामान्यरित्या आढळणारे अनेक जीवाणू आहेत ज्यांच्यामुळे आजार होऊ शकतात. दमट त्वचेमुळे या जीवाणूंना आजार निर्माण करण्याची संधी मिळते. फॉलीक्यूलायटीस हा आजार Staphylococcus नावाचा जीवाणू निर्माण करतो. यात केसांच्या बिजकोशांवर सूज निर्माण होते व पू भरलेले फोड दिसयला लागतात. हा आजार केसाळ भागांमध्ये दिसतो. फोडांना अनेकदा कंड सुटू शकतो व वेदनाही होऊ शकतात. हाच आजार जर विकोपाला गेला तर गळू निर्माण होतो.
- विषाणूंचे संक्रमण : विषाणूच्या संक्रमणामुळे ताप भरला असेल, तर त्याचे प्रभाव किंवा लक्षणे पुरळाच्या माध्यमातून त्वचेवर उमटू शकतात. पिटीरीयासीस रोसिया असा एक आजार आहे. ज्यात आधी घशात विषाणूंचे संक्रमण होते आणि मग त्वचेवर त्याचे परिणाम दिसून येतात. या आजारामध्ये लाल गोल चट्टे उमटतात, ज्यांना कंड सुटतो. संपूर्ण शरीरावर ते दिसतात.
- घामोळे : घामोळं आलं की शरीरावर, विशेषतः पाठीवर खाज सुटते. नीट तपासलं तर घामोळे प्रामुख्याने आढळतात. हवेतील आर्द्रता वाढल्यामुळे घाम निर्माण करणाऱ्या ग्रंथीचे तोंड बंद होऊ शकतं. ज्यामुळे घाम हा त्वचेच्या आतच साचतो आणि मग फुटतो.
- इसब : यात त्वचा कोरडी पडू लागते. कोरड्या त्वचेला कंड सुटतो आणि मग इसब सारखे आजार दिसायला लागते. तिच्यावर चट्टे येतात. काही वेळा किटक चावल्यामुळे डास चावल्याने होणारा आजाराला त्वचेवरचे पित्त म्हणता येईल. सहसा डास चावल्यावर त्या जागी छोटी लाल गांधी उठते ज्याला कंड सुटतो. त्या जागी जखमसुद्धा होऊ शकते. त्यामुळे त्वचेत रक्तस्त्राव होऊन त्वचेवर नीळसर काळे चपटे डाग निर्माण होऊ शकतात.

## पिण्याच्या पाण्याबद्दल राहा जागरूक

पावसाळ्यात पिण्याच्या पाण्याबद्दल विशेष जागरूक राहावे. पावसाळ्यात अनेकदा पाण्यात नदीचा गाळ, मैला, कचरा आणि अन्य प्रदूषित पदार्थ वाहून येत असतात. त्याच बरोबर अनेक प्रकारचे पचनसंस्थेचे विषाणू; त्याचप्रमाणे टायफॉइड, डिसेन्ट्री, कॉलरा अशा आजारांचे जीवाणू; अमीबा, जियार्डीया असे प्रोटोझोअल जीव, कित्येक घटक रसायने, विषारी पदार्थ, कचरा हे देखील पाण्यामध्ये एकत्रित झालेले असतात. असे दूषित पाणी प्यायल्याने उलट्या, जुलाब, रक्ती आव, आमांश, कॉलरा, टायफॉइड, पॅराटायफॉइड अशांसारखे जीवाणूजन्य आजार होऊ शकतात. काविळीचे हिपॅटायटिस ए आणि इ, लहान बालकांना जुलाबाची पीडा देणारा रोटाव्हायरस, बालकांना पंगू करून सोडणारा पोलिओमायलायटिस असे विषाणूजन्य आजारदेखील दूषित पाण्यातून पसरतात.

## अंधारात झोपा, कर्करोगाला रोखा!

**तुम्हाला माहीत आहे का, की तुमच्या झोपण्याच्या सवयींचा तुमच्या आरोग्यावरही खोलवर परिणाम होतो? अलीकडील संशोधन असे दर्शविते की जर तुम्ही पूर्ण अंधारात झोपला नाही तर शरीरातील हार्मोनल संतुलन बिघडू शकते. ज्यामुळे कर्करोगासारख्या आजारांचा धोका वाढू शकतो...**



जेव्हा आपण प्रकाशात झोपतो, मग तो रात्रीचा दिवा असो किंवा मोबाईल स्क्रीनचा निळा प्रकाश असो मेलाटोनिन हार्मोनचा स्त्राव बिघडतो. मेलाटोनिन हे केवळ झोपेसाठी महत्त्वाचे नाही तर आपल्या रोगप्रतिकारक शक्ती आणि पेशी दुरुस्ती प्रणालीमध्ये देखील महत्त्वाची भूमिका बजावते. संशोधनानुसार या संप्रेरकाच्या कमतरतेमुळे शरीरात पेशींचे नुकसान आणि ट्यूमर वाढण्याची शक्यता वाढते. मेलाटोनिन हा एक हार्मोन आहे जो आपल्या मेंदूतील पाइनल ग्रंथीमधून बाहेर पडतो आणि तो शरीराला झोपण्याची वेळ झाल्याचे संकेत देतो. परंतु त्याची भूमिका केवळ झोपेपुरती मर्यादित नाही. तो शरीरात कर्करोगविरोधी गुणधर्मांसाठी देखील ओळखला जातो. जेव्हा तुम्ही पूर्ण अंधारात झोपता तेव्हा मेलाटोनिनचा स्त्राव जास्त असतो, जो शरीराच्या पेशी दुरुस्ती प्रक्रियेत सुधारणा करतो आणि मुक्त रॅडिकल्सचा प्रभाव कमी करतो. अनेक संशोधनातून असे दिसून आले आहे की मेलाटोनिन स्तन आणि प्रोस्टेट कर्करोगासारख्या आजारांचा धोका कमी करू शकतो.

### प्रकाशात झोपणे धोकादायक

रात्रीच्या वेळी अगदी थोडासा प्रकाशही - मग तो टेबल लॅम्प असो किंवा टीव्हीचा प्रकाश असो, शरीराच्या जैविक घड्याळाला त्रास देऊ शकतो. यामुळे झोपेच्या चक्रात व्यत्यय येतो, मेलाटोनिनची पातळी कमी होते आणि रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत होते. दीर्घकाळ झोपण्याच्या सवयी तुमच्या पेशींच्या वाढीवर नियंत्रण ठेवू शकतात, ज्यामुळे ट्यूमर तयार होण्याचा धोका वाढतो. WHO ने रात्रीच्या शिफ्टमध्ये काम करणे संभाव्य कार्सिनोजेन म्हणून देखील वर्गीकृत केले आहे, जे ही सवय किती गंभीर असू शकते हे दर्शवते.

### झोपेची गुणवत्ता आणि कर्करोगाचा संबंध

गाढ आणि शांत झोप ही शरीरासाठी एक नैसर्गिक उपचार आहे. ती केवळ शरीराला आराम देतेच असे नाही तर डीएनए दुरुस्ती, हार्मोनल संतुलन आणि रोगप्रतिकारक पेशींना देखील बळकटी देते. जेव्हा तुम्ही पूर्ण अंधारात झोपता तेव्हा झोपेची खोली आणि सातत्य वाढते, ज्यामुळे शरीर स्वतःला चांगले दुरुस्त करण्यास मदत होते. कमी झोप, वारंवार झोपेचा व्यत्यय किंवा प्रकाशात झोपणे यामुळे कर्करोगाशी संबंधित अनेक प्रक्रिया सुरू होऊ शकतात, विशेषतः स्तन आणि कोलन कर्करोगात त्याचा परिणाम दिसून आला आहे.

### कोणते कर्करोग जोडलेले?

वैज्ञानिक अभ्यासानुसार (संदर्भ) प्रकाशात झोपण्याची सवय प्रामुख्याने स्तनाच्या कर्करोग आणि प्रोस्टेट कर्करोगाच्या प्रकरणांमध्ये दिसून आली आहे. असे आढळून आले आहे की रात्री प्रकाशात झोपण्याची सवय असलेल्या महिलांमध्ये स्तनाच्या कर्करोगाचा धोका २०-३०% वाढतो. मेलाटोनिनच्या पातळीत घट झाल्यामुळे शरीराची अँटिऑक्सिडंट क्षमता कमी होते, ज्यामुळे कर्करोगाच्या पेशी वाढू शकतात. हे पुरुषांमध्ये प्रोस्टेट कर्करोगाचे कारण असू शकते.

### बेडरूम अनुकूल कशी बनवायची?

जर तुम्हाला तुमची झोप मेलाटोनिनने भरलेली हवी असेल आणि तुमच्या शरीराला पूर्ण विश्रांती मिळावी असे वाटत असेल, तर तुमची खोली अंधारी आणि शांत करा. रात्री झोपण्यापूर्वी मोबाईल किंवा लॅपटॉप वापरू नका, खिडकीवरील ब्लॅकआउट पडदे लावा आणि रात्रीचा दिवा किंवा एलईडी लाईट बंद ठेवा. तुम्हाला हवे असेल तर झोपताना तुम्ही डोळ्यांवर स्लीप मास्क देखील घालू शकता. या छोट्या सवयी तुमच्या झोपेच्या गुणवत्तेत मोठा फरक करू शकतात आणि कर्करोगासारख्या आजारांपासून तुमचे रक्षण करू शकतात.

### संबंधाबद्दल शास्त्रज्ञ काय म्हणतात?

मेलाटोनिनचा अभाव आणि रात्रीच्या वेळी प्रकाशाच्या संपर्कामुळे कर्करोगाचा धोका वाढू शकतो. या अभ्यासात असेही आढळून आले आहे की रात्रीच्या शिफ्टमध्ये काम करणाऱ्या लोकांमध्ये सामान्य लोकांपेक्षा कर्करोगाचे प्रमाण जास्त असते. शास्त्रज्ञांचा असा विश्वास आहे की मेलाटोनिन पेशींना ऑक्सिडेटिव्ह नुकसानापासून वाचवण्यास मदत करते आणि जेव्हा त्याची पातळी कमी होते तेव्हा हे संरक्षण संपते. म्हणूनच अंधारात झोपणे ही केवळ सवय नाही, तर ती आरोग्याची गरज आहे.

# प्रारंभिक अधिसूचना कलम ११

क्र.२०२१/उपजि/लसिका /सिआर-२६
कार्यालय- उपजिल्हाधिकारी (भूसंपादन)
लसिका नांदेड.
दिनांक :- १५/०६/२०२६.

**भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३.**

क्रमांक क्र.२०२१/उपजि /लसिका /सिआर-२६ ज्याअर्थी, भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाव्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन काढण्यात आलेली अधिसुचना महसूल वन विभाग क्र. संकिर्ण १९/२०१४/प्र.क्र७७/अ दिनांक १९ जानेवारी २०१५ (यात या पुढे जिचा निर्देश उक्त अधिसुचना असा करण्यात आला आहे.) याव्दारे असे अधिसुचित केलें आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ खंड (झेड ओ) असे व्याख्या केलेल्या एखादया सार्वजनिक प्रयोजनासाठी एखादया जिल्हयातील १०,००० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता जमीन संपादन करण्याच्या संबंधात अशा जिल्हयाचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसुचनेनुसार समुचित शासन असलेल्या नांदेड जिल्हयाच्या जिल्हाधिका-यास यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात पुढे जिचा निर्देश उक्त सार्वजनिक प्रयोजन असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे वाटते, ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनूसूची दोनमध्ये दिलेले आहे, आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (१) च्या तरतुदीन्वये याव्दारे असे अधिसुचित करण्यात येते की, उक्त जमीनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमि संपादनाच्या अनुषंगाने बाधीत व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, या सोबत जोडलेल्या अनुसुची तीन मध्ये दिलेली आहेत. आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसुची चार मध्ये दिलेला आहे.

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल, या सोबत जोडलेल्या अनुसुची पाचमध्ये दिलेला आहे.

त्याअर्थी आता असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम ४ अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसुचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पुर्ण हाईल त्या कालावधीपर्यत उक्त जमीनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमीनीवर कोणतीही भार निर्माण करणार नाही.

परंतु उक्त जमीनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर जिल्हाधिका- यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी कारणे नमुद करुन अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम ( ५ ) अनुसार, जिल्हाधिकारी भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१३ (यात यापुढे ज्यांचा निर्देश उक्त नियम असा करण्यात आला आहे) यांच्या नियम १० च्या उप नियम (३) व्दारे विहित केल्याप्रमाणे भूमि अभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पुर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी यांनी उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) लसिका नांदेड यास पदनिर्देशित केले आहे.

अनुसूची- एक
संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन
गाव- मौ. राहेगाव तालुका नांदेड जिल्हा नांदेड

| अनुक्रमांक | भूमापन किंवा गट क्रमांक | संपादित क्षेत्र हे. आर |
|---|---|---|
| १ | २ | ०.०३ |
| २ | ३ | ०.०३ |
| ३ | ४ | ०.०५२६ |
| ४ | ५ | ०.०८ |
| ५ | ५ | ०.०२ |
| ६ | ६ | ०.०१ |
| ७ | ३२ | ०.१३ |
| ८ | ३२ | ०.०७ |
| ९ | ३३ | ०.२४ |
| १० | ३४ | ०.११ |
| ११ | ३४ | ०.०९ |
| १२ | ३५ | ०.०५ |
| १३ | ३५ | ०.११ |
| १४ | ३६ | ०.४१ |
| १५ | ३७ | ०.०७ |
| १६ | ४२ | ०.०६ |
| १७ | ४३ | ०.०४ |
| १८ | ४४ | ०.०७ |
| १९ | १५१ | ०.०२ |
| २० | १५२ | ०.०२ |
| २१ | १५३ | ०.०५ |
| २२ | १५४ | ०.१२ |
| २३ | १५५ | ०.९९ |
| २४ | १५६ | ०.०९ |
| २५ | १५७ | ०.१३ |
| २६ | १५८ | ०.२४ |
| | एकूण | ३.३३२६ |

अनुसूची- दोन
सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नाव:- भूसंपादन प्रस्ताव आमदुरा उच्च पातळी बंधाऱ्याच्या बुडीत क्षेत्रासाठी मौ. राहेगाव ता. नांदेड, जिल्हा नांदेड.

प्रकल्प कार्यालयाचे वर्णन:- कार्यकारी अभियंता विष्णुपुरी प्रकल्प विभाग क्र. २ नांदेड.

अनुसूची- तीन

बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे लागू नाही.

अनुसूची- चार

(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अभिकरणाने दिलेला) सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश लागू नाही.

अनुसूची- पाच

**नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील भूधारकाचे विस्थापन होत नसल्यामुळे प्रशासक नियुक्ती लागू नाही.**

**टिप:- उक्त जमिनीच्या आराखडयाचे उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) लसिका नांदेड यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.**

**दिनांक :- १५/०६/२०२६**
**ठिकाण:- नांदेड.**

(प्रियांका पवार)
उपजिल्हाधिकारी (भूसंपादन)
लसिका नांदेड.

जिमाका/नां/जाहिरात-३५/ २०२६-२७

---

तहसीलदार तथा दंडाधिकारी नायगांव (खै.) यांचे न्यायालयात
प्रकरण- जन्म/मृत्यू नोंद घेणे बाबत
अर्ज क्रं. ७२८/२०२६

## जाहीर प्रगटन

विषय:- जन्म /मृत्यू नोंदणी अधिनियम सुधारित आशि जन्म व मृत्यू नोंदणी १९६९ चे कलम १३ (३) अन्वये जन्माची नोंद घेणेसाठी आदेश देण्याबाबतचे जाहिर प्रगटन.

संदर्भ- अर्जदार श्री. किशन गोविंद वाघमारे रा.रुई बु.ता.नायगांव (खै.) जि.नांदेड यांचा अर्ज दि.०२/०६/२०२६

ज्याअर्थी अर्जदार श्री. किशन गोविंद वाघमारे रा. रुई बु.ता.नायगांव (खै.) जि.नांदेड यांचा अर्ज दि.०२/०६/२०२६ अर्जदार यांचा मुलगा कुनाल किंशन वाघमारे यांचा जन्म दि. १०/१०/२०१० रोजीची जन्म नोंद आदेश मिळणे बाबत विनंती केली आहे. तसेच अर्जदार यांनी ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत कार्यालय रुई बु ता.नायगांव (खै.) जि.नांदेड येथे जन्म/मृत्यू दाखल्याचा मागणी अर्ज दिला असता संबधित उपनिबंधक जन्म/मृत्यू नोंद ग्राम पंचायत रुई बु ता. नायगांव (खै.) जि.नांदेड येथे जन्म/मृत्यू नोंद अधिनियम १९६९ च्या कलम ११ अन्वये नमुना १० (अ) व १० (ब) अन्वये नोंद नसल्याचे लेखी अनुलब्धता प्रमाणपत्र दि. १०/०३/२०२६ रोजीचे अर्जासोबत सादर केलेले आहे.
त्याअर्थी, अर्जदार यांनी त्यांच्या वकीलामार्फत या न्यायालयात जन्म/मृत्यू नोंदणी अधिनियम २०२३ (सुधारीत) आणि कलम १३ (३) नुसार जन्म/मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ अन्वये अर्जदार यांचा मुलगा कुनाल किशन वाघमारे यांचा जन्म दि. १०/१०/२०१० जन्माची नोंद घेण्यासाठी ग्रामपंचायत कार्यालय रुई बु ता. नायगांव (खै.) जि.नांदेड यांनी जन्म नोंद घेण्यासाठी आदेश देण्याबाबत विनंती केली आहे. त्याअनुषंगाने अर्जदार यांची जन्माची खात्री करण्यासाठी या जाहिर प्रगटना व्दारे वर्तमानपत्रात प्रसीध्दी करण्यात येत आहे. जर कोणाचा आक्षेप किंवा उजर असेल तर त्यांनी तहसिलदार तथा तालूका दंडाधिकारी नायगांव (खै.) यांचे न्यायालयात जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावा. अन्यथा कोणताही आक्षेप नाही असे गृहीत धरुन अर्जदाराचा अर्ज मंजूर करण्यात येईल. याची नोंद घ्यावी. आज दिनांक १७/०६/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी या न्यायालयाच्या शिक्यासह देण्यात येते.

तहसिलदार नायगांव (खै.) तथा
तालुका दंडाधिकारी नायगांव (खै.)

---

## स्कूल बसवर झाड कोसळून एकाचा मृत्यू, १० मुले गंभीर

**मुंबई(प्रतिनिधी)** -मुंबई-तील चेंबूर भागात एक धक्कादायक घटना घडली आहे. एक भले मोठे झाड स्कूल बसवर पडल्याने तब्बल १० विद्यार्थी गंभीर जखमी झाले आहेत. यातील एका विद्यार्थिनीचा मृत्यू झाल्याची माहिती समोर येत आहे. दरम्यान ही घनटा समोर आल्यानंतर सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. जखमी विद्यार्थ्यांना बाहेर काढण्यासाठी युद्धपातळीवर बचावकार्य करण्यात आले. दरम्यान, आता ही घटना नेमकी घडली तरी कशी? असा प्रश्न उपस्थित केला जातोय?

मिळालेल्या माहितीनुसार मुंबईतील चेंबूर या भागात भल्या मोठ्या झाडाखाली पिवळ्या रंगाची एक स्कुल बस थांबलेली होती. या स्कुलबसमध्ये एकूण १३ विद्यार्थी बसलेले होते. पावसाच्या पाण्यामुळे काही ठिकाणी पाणी होते. बस ज्या ठिकाणी थांबलेली होती, त्याच्याच बाजूला एक महाकाय असे झाड होते. हे झाड खूप वर्षांपूर्वीचे असावे, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

---

## टी. सी. हरवली

माझी ओमकार रमेश सावळे या नावाची इयत्ता बारावी पासची टीसी कापसी् गुंफा् ते् कौठा् फाटा् बस् प्रवासादरम्यान हरवली आहे सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी ् देणाऱ्यास येण्या जाण्याचा खर्च व योग्य ते बक्षीस देण्यात येईल

**संपर्क पत्ता**-रमेश निवास धनंज खुर्द ता्. लोहा् मो्.९१६८३२४०४४

## टी. सी. हरवली

माझी यशवंत गोविंदराव पाटील या नावाची इयत्ता १२ वी पास विज्ञान शाखेची सौ. मंजुळाबाई ज्युनिअर कॉलेज खतगाव ता. बिलोली या विद्यालयाची टी. सी. व इतर शैक्षणिक कागदपत्रे खतगाव ते नांदेड प्रवासात हरवली आहेत. कोणाला सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा. संपर्क- यशवंत गोविंदराव पाटील रा. खतगाव ता. बिलोली जि. नांदेड संपर्क -७७७६९९९५३०

**झाडे लावा, झाडे जगवा**

## Change In Name

My Old Name is **SHAIKH SAMEENA BEGUM MOINODDIN PATEL** which now I am changing as New Name **SAMEENA BEGUM ABU CHAUSH** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same. **Address - S.No. 42, Plot No. 17 (2-5-441/3) Behind Zeba Function Holl, Nanded Nanded Nanded Maharashtra-431601 Mo.8087491473**

## Change In Name

My Old Name is **CHOUDHARI YOGESH PRAMODRAO** which now I am changing as New Name **YOGESH PRAMOD CHAUDHARY** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.
**Address - Flat No. 202 Mayur Appartment Cidco Road Nanded opp-ShantiNiketan High school Cidco Kautha-431603**

## Change In Name

My Old Name is **PATIL MANOHAR MAROTRAO** which now I am changing as New Name **PATIL MANOHAR MAROTIRAO** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.
**Address - At.Po. Kasrali, Motha Galli, Kasrali, Tq. Biloli Dist. Nanded 431710 Mo.No. 9766075681**

---

**महावितरण** — **जाहीर सूचना**

सर्व संबंधितांना या जाहीर सूचनेद्वारे कळवण्यात येते की, नगर परिषद, देगलूर हद्दीतील ३३/११ के.व्ही. उपकेंद्र परिसर देगलूर येथील गट क्र. ३०७, ३०९ व ३२१ मधील महावितरण कंपनीच्या मालकीची/ ताब्यातील जागेमध्ये सं. व सु. विभागीय कार्यालय देगलूर करिता नवीन इमारत बांधण्याचे प्रस्तावित आहे. सदर जागेवरती असलेले वृक्ष तोडणे करिता नगर परिषद देगलूर यांची परवानगी प्राप्त आहे. वृक्षतोड आवश्यक असलेल्या झाडांचा तपशील खालीलप्रमाणे –

- **वृक्षाचा प्रकार – निलगिरी वृक्ष – ०८ व जंगली वृक्ष – ०१ (एकूण वृक्षाची संख्या – ०९)**

वरीलप्रमाणे वृक्षतोड करून छाटणी केलेले वृक्ष स्वखर्चाने व आवश्यक वाहतूक परवानगीसहित वाहतूक करून ३३/११ के.व्ही. उपकेंद्र परिसर देगलूर येथून इच्छित स्थळी विल्हेवाट लावणे व परिसराची साफसफाई करून देणे करिता संबंधित व्यक्ती/कंत्राटदार यांचेकडून कोटेशन/ प्रस्ताव/ दर मागविण्यात येत आहेत.
कोरे कोटेशन प्राप्त करून खालील पत्त्यावर सादर करण्याचा कालावधी –
दि. ०१.०७.२०२६ ते दि. ०७.०७.२०२६ (कार्यालयीन वेळेत)

**दिनांक: ३०.०६.२०२६**
**स्थळ: नांदेड**
पत्ता: स्थापत्य विभाग, विद्युत भवन,
अण्णाभाऊ साठे चौक, नवा मोंढा, नांदेड – ४३१६०२.
मो. क्र. – ७८७५७६४४६०/ ७८७५७६४४६८

**PRO No. Nanded/ 35 / 2026-27 Dt. 30.06.2026**

**कार्यकारी अभियंता (स्था.)**
**स्थापत्य विभाग, महावितरण, नांदेड.**

## Change In Name

My Old Name is **SHIVANAND DIGAMBARRAO LATHKAR** which now I am changing as New Name **SHIVANAND DIGAMBERRAO LATHKAR** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.
**Address - SHIVANAND DIGAMBERRAO LATHKAR S/O ND-5 H. NO. 11-4-10 BEHIND RAM MANDIR CIDCO NEW NANDED 431603 MO. NO. 9421767876**

---

तहसीलदार तथा दंडाधिकारी नायगांव (खै.) यांचे न्यायालयात
प्रकरण- जन्म/मृत्यू नोंद घेणे बाबत
अर्ज क्रं.७३२/२०२६

## जाहीर प्रगटन

विषय:- जन्म /मृत्यू नोंदणी अधिनियम सुधारित आणि जन्म व मृत्यू नोंदणी १९६९ चे कलम १३ (३) अन्वये जन्माची नोंद घेणेसाठी आदेश देण्याबाबतचे जाहीर प्रगटन.

संदर्भ- अर्जदार श्री किरण किशन वाघमारे रा.रुई बु.ता. नायगांव (खै.) जि.नांदेड यांचा अर्ज दि. ०२/०६/२०२६ ज्याअर्थी अर्जदार किरण किशन वाघमारे रा.रुई बु.ता. नायगांव (खै.) जि.नांदेड यांचा अर्ज दि. ०२/०६/२०२६ अर्जदार किरण किशन वाघमारे यांचा जन्म दिनांक ०१/०९/२००७ रोजीची जन्म नोंद आदेश मिळणे बाबत विनंती केली आहे. तसेच अर्जदार यांनी ग्राम पंचायत अधिकारी ग्रामपंचायत कार्यालय रुई बु ता. नायगांव (खै.) जि.नांदेड येथे जन्म/मृत्यू दाखल्याचा मागणी अर्ज दिला असता संबंधित उपनिबंधक जन्म/मृत्यू नोंद ग्राम पंचायत रुई बु ता.नायगांव (खै.) जि.नांदेड येथे जन्म/मृत्यू नोंद अधिनियम १९६९ च्या कलम ११ अन्वये नमुना १० (अ) व १० (ब) अन्वये नोंद नसल्याचे लेखी अनुलब्धता प्रमाणपत्र दि. ०२/०६/२०२६ रोजीचे अर्जासोबत सादर केलेले आहे.
त्याअर्थी, अर्जदार यांनी त्यांच्या वकीलामार्फत या न्यायालयात जन्म/मृत्यू नोंदणी अधिनियम २०२३ (सुधारीत) आणि कलम १३ (३) नुसार जन्म/मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ अन्वये अर्जदार किरण किशन वाघमारे यांचा जन्म दिनांक ०१/०९/२००७ जन्माची नोंद घेण्यासाठी ग्रामपंचायत कार्यालय रुई बु ता.नायगांव (खै.) जि.नांदेड यांनी जन्म नोंद घेण्यासाठी आदेश देण्याबाबत विनंती केली आहे. त्याअनुषंगाने अर्जदार यांची जन्माची खात्री करण्यासाठी या जाहिर प्रगटना व्दारे वर्तमानपत्रात प्रसीध्दी करण्यात येत आहे. जर कोणाचा आक्षेप किंवा उजर असेल तर त्यांनी तहसिलदार तथा तालूका दंडाधिकारी नायगांव (खै.) यांचे न्यायालयात जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावा. अन्यथा कोणताही आक्षेप नाही असे गृहीत धरुन अर्जदाराचा अर्ज मंजूर करण्यात येईल. याची नोंद घ्यावी. आज दिनांक १७/०६/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी या न्यायालयाच्या शिक्यासह देण्यात येते.

**स्वा/-**
**तहसिलदार नायगांव (खै.) तथा**
**तालुका दंडाधिकारी नायगांव (खै.)**

तहसीलदार तथा दंडाधिकारी नायगांव (खै.) यांचे न्यायालयात
प्रकरण- जन्म/मृत्यू नोंद घेणे बाबत
अर्ज क्रं.७३२/२०२६

## जाहीर प्रगटन

विषय:- जन्म /मृत्यू नोंदणी अधिनियम सुधारित आणि जन्म व मृत्यू नोंदणी १९६९ चे कलम १३ (३) अन्वये जन्माची नोंद घेणेसाठी आदेश देण्याबाबतचे जाहीर प्रगटन.

संदर्भ- अर्जदार श्री किरण किशन वाघमारे रा.रुई बु.ता. नायगांव (खै.) जि.नांदेड यांचा अर्ज दि. ०२/०६/२०२६ ज्याअर्थी अर्जदार किरण किशन वाघमारे रा.रुई बु.ता. नायगांव (खै.) जि.नांदेड यांचा अर्ज दि. ०२/०६/२०२६ अर्जदार किरण किशन वाघमारे यांचा जन्म दिनांक ०१/०९/२००७ रोजीची जन्म नोंद आदेश मिळणे बाबत विनंती केली आहे. तसेच अर्जदार यांनी ग्राम पंचायत अधिकारी ग्रामपंचायत कार्यालय रुई बु ता. नायगांव (खै.) जि.नांदेड येथे जन्म/मृत्यू दाखल्याचा मागणी अर्ज दिला असता संबंधित उपनिबंधक जन्म/मृत्यू नोंद ग्राम पंचायत रुई बु ता.नायगांव (खै.) जि.नांदेड येथे जन्म/मृत्यू नोंद अधिनियम १९६९ च्या कलम ११ अन्वये नमुना १० (अ) व १० (ब) अन्वये नोंद नसल्याचे लेखी अनुलब्धता प्रमाणपत्र दि. ०२/०६/२०२६ रोजीचे अर्जासोबत सादर केलेले आहे.
त्याअर्थी, अर्जदार यांनी त्यांच्या वकीलामार्फत या न्यायालयात जन्म/मृत्यू नोंदणी अधिनियम २०२३ (सुधारीत) आणि कलम १३ (३) नुसार जन्म/मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ अन्वये अर्जदार किरण किशन वाघमारे यांचा जन्म दिनांक ०१/०९/२००७ जन्माची नोंद घेण्यासाठी ग्रामपंचायत कार्यालय रुई बु ता.नायगांव (खै.) जि.नांदेड यांनी जन्म नोंद घेण्यासाठी आदेश देण्याबाबत विनंती केली आहे. त्याअनुषंगाने अर्जदार यांची जन्माची खात्री करण्यासाठी या जाहिर प्रगटना व्दारे वर्तमानपत्रात प्रसीध्दी करण्यात येत आहे. जर कोणाचा आक्षेप किंवा उजर असेल तर त्यांनी तहसिलदार तथा तालूका दंडाधिकारी नायगांव (खै.) यांचे न्यायालयात जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावा. अन्यथा कोणताही आक्षेप नाही असे गृहीत धरुन अर्जदाराचा अर्ज मंजूर करण्यात येईल. याची नोंद घ्यावी. आज दिनांक १७/०६/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी या न्यायालयाच्या शिक्यासह देण्यात येते.

**स्वा/-**
**तहसिलदार नायगांव (खै.) तथा**
**तालुका दंडाधिकारी नायगांव (खै.)**

**कुत्रीचे पिल्ले विकणे आहे**

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१

तसेच दवाखान्यात बीएएमएस महिला डॉक्टरची नेमणूक करणे आहे.



# गोदातीर समाचार



**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




# जिल्ह्यातील २७ लाख ७७ हजार मतदारांच्या विशेष सखोल पुनरिक्षणास प्रत्यक्ष सुरुवात

## एसआयआर मोहिमेत घरी येणाऱ्या बीएलओंना सहकार्य करा -जिल्हाधिकारी

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यात मंगळवार, दि. ३० जूनपासून विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी मतदारांच्या घरोघरी प्रत्यक्ष भेट देऊन गणना पत्रक वाटप करणार आहेत. तसेच मतदारांची पडताळणी करणार आहेत. जिल्ह्यात एकूण २७ लाख ७७ हजार ७३ एवढ्या मतदारांची बीएलओ मार्फत पडताळणी केली जाणार आहे. त्यासाठी छपाई करण्यात आलेल्या गणना प्रपत्राची संख्या मतदारांच्या दुप्पट म्हणजे ५५,५४,१४६ एवढी आहे. त्याअनुषंगाने कार्यवाही सुरू आहे. प्रत्यक्ष मतदारांच्या विशेष सखोल पुनरिक्षणास ३० जून २०२६ रोजी पासून सुरुवात झाली असून, या मोहिमेसाठी आपल्या घरी येणाऱ्या बीएलओना सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.



या मोहिमेअंतर्गत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) घरोघरी जाऊन मतदारांची पडताळणी करतील. त्यासाठी जिल्ह्यातील सर्व बीएलओंना मागील आठवडाभरापासून प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्यात आले आहे.

**एसआयआरचा मुख्य उद्देश**

एकही पात्र मतदार मतदार यादीतून वंचित राहू नये तसेच अपात्र मतदार मतदान यादीत समाविष्ट होवू नये यासाठी संपूर्ण प्रशासन कटिबध्द आहे. पात्र मतदाराला कोणत्याही परिस्थितीत वंचित राहू दिले जाणार नाही, अशी माहिती जिल्हा प्रशासनाने कळविली.

**असे आहे एसआयआर कार्यक्रमाचे वेळापत्रक** : ३० जून ते २९ जुलै– मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांमार्फत घरोघरी भेटी, ५ ऑगस्ट - प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध, ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर–दावे व हरकती नोंदविण्याचा कालावधी, ५ ऑगस्ट ते ३ ऑक्टोबर–हरकतींवरील प्रत्यक्ष सुनावणी व दावे व हरकती निकाली काढणे, ७ ऑक्टोबर–अंतिम मतदार याद्यांची प्रसिद्धी, आपले नाव मतदार यादीत शोधा किंवा फॉर्म भरा, आपले नाव मतदार यादीत शोधा किंवा ऑनलाईन अर्ज भरा. यासाठी निवडणूक आयोगाच्या voters.eci.gov.in या संकेतस्थळावर सुविधा उपलब्ध आहे. मदतीसाठी १९५० या टोल फ्री हेल्पलाईन संपर्क दिलेला आहे.

भारत निवडणूक आयोगाने विकसित केलेले ECINET हे ॲप प्ले स्टोअरवर मोफत उपलब्ध आहे. हे ॲप डाउनलोड करून २००२ च्या मतदार यादीतील स्वतःचे किंवा आपल्या नातेवाईकांचे नाव सहजपणे शोधता येते. नागरिकांनी या सुविधेचा लाभ घेऊन ECINET ॲपचा वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# सोमवारी लोकशाही दिनाचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)–** सामान्य जनतेच्या तक्रारी, अडचणी न्याय व तत्परतेने सोडविण्यासाठी प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिन आयोजित करण्यात येतो. जिल्हा प्रशासनाच्यावतीने लोकशाही दिन सोमवार, दि. ६ जुलै रोजी दुपारी १ ते ३ वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील नियोजन भवन येथे आयोजित केला आहे.

या दिवशी महसूल, गृह, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, पाटबंधारे, बांधकाम, परिवहन, सहकार, कृषी विभाग व पाणी पुरवठा समन्वय अधिकारी इत्यादी जिल्हा स्तरावरील प्रमुख अधिकारी व ज्या कार्यालयाचे लोकशाही दिनात प्रलंबीत प्रकरणे आहेत असे अधिकारी बचत भवन जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात उपस्थित राहतील. सकाळी १२ वाजेपासून निवेदनाची नोंदणी सुरु होणार आहे. त्यानंतर लगेचच प्राप्त झालेल्या अर्जावर, निवेदनावर म्हणणे ऐकून घेण्याच्या कामास सुरुवात करण्यात येईल.

# 'अमृत संवाद सेतू' उपक्रमांतर्गत नायगावच्या आयटीआय विद्यार्थ्यांनी अनुभवले तहसील कार्यालयाचे कामकाज



**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्रातील युवक-युवतींना शासकीय कार्यालयीन कामकाजाची प्रत्यक्ष ओळख व्हावी, प्रशासकीय यंत्रणेतील पदे व जबाबदाऱ्या समजून घेता याव्यात आणि प्रशासन व नागरिक यांच्यातील संवाद अधिक सुलभ व्हावा, या उद्देशाने 'अमृत' (Academy of Maharashtra Research Upliftment and Training) संस्थेच्या वतीने अमृत संवाद सेतू उपक्रम राबविण्यात येत आहे. या नाविन्यपूर्ण सामाजिक उपक्रमांतर्गत २५ जून २०२६ रोजी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय), नायगाव येथील विद्यार्थ्यांना तहसील कार्यालय, नायगाव येथे अभ्यास दौऱ्यावर घेऊन जाण्यात आले.

या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना कार्यालयातील प्रत्येक विभागाची सविस्तर आणि प्रत्यक्ष माहिती देण्यात आली. वित्त विभाग, महसूल १ व २, अभिलेख (रेकॉर्ड रूम), लेखा विभाग आणि आवक-जावक विभागाच्या प्रमुखांनी विद्यार्थ्यांना विभागाच्या कामकाजाची अतिशय महत्त्वाची माहिती देऊन मार्गदर्शन केले.

दौऱ्याच्या शेवटी तहसीलदार धम्मप्रिया गायकवाड यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. शासकीय कार्यालयांची भीती मनातून काढून एक जबाबदार नागरिक बनण्याचे आवाहन केले. युवकांना प्रशासनाशी जोडणाऱ्या या उपक्रमाबद्दल 'अमृत' संस्थेचे मनापासून अभिनंदन करत त्यांनी अत्यंत आनंद व्यक्त केला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना आपले अनेक प्रश्न प्रशासनासमोर मांडता आले आणि त्यांची उत्तरेही मिळाली.

या प्रसंगी अमृत संस्थेचे विभागीय उपव्यवस्थापक ओमकार शेटे, अमृत नांदेडचे जिल्हा व्यवस्थापक सौरभ कुलकर्णी, आयटीआय नायगावचे प्राचार्य पांडुरंग अन्नपुर्णे, उपप्राचार्य तोडकर, संस्थेचे आयएमसी (खचउ) सदस्य लक्ष्मण बुद्धलवाड यांच्यासह गट निदेशक आणि ४० विद्यार्थी उपस्थित होते. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी अमृत नांदेडचे उपजिल्हा व्यवस्थापक विश्वेश्वर जोशी यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यांच्या नेटके नियोजनामुळे विद्यार्थ्यांना प्रशासकीय कामकाजाचा हा सुवर्ण अनुभव घेता आला. प्रशासकीय यंत्रणा इतक्या जवळून अनुभवता आल्याबद्दल आयटीआय नायगावचे प्राचार्य, सर्व स्टाफ आणि विद्यार्थ्यांनी 'अमृत' संस्थेचे मनःपूर्वक आभार मानले.


**पान १ वरून...**


**जिल्हा बँकेच्या निवडणुकीत...**

राष्ट्रवादीचे आ. प्रताप पा. चिखलीकर, माजी मंत्री भास्करराव खतगावकर, शिवसेना आ. हेमंत पाटील, आ. बालाजी कल्याणकर आदी नेते छुपी रणनिती आखत आहेत. तर कॉंग्रेस तथा आघाडीचे खा. रविंद्र चव्हाण आणि टिम लढा देण्याचा प्रवत्न करत आहेत. तर दुसरीकडे इच्छुकांनी जिल्हा बँकसाठी मनसोक्त अर्ज दाखल केले आहेत.

तसेच आ. भीमराव केराम, माजी आ. मोहनराव हंबर्डे, खा. नागेश पाटील आष्टीकर यांचे पूत्र कृष्णा पाटील आष्टीकर, माजी आ. रोहिदास चव्हाण यांचे पूत्र नवनाथ चव्हाण, भाजपचे बी.आर. कदम, माजी सभापती संजय कऱ्हाळे, दिलीप कंदकुर्ते, माजी आ. हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, जि.प.चे माजी अध्यक्ष दिलीप पाटील बेटमोगरेकर, माजी जि.प. सदस्या प्रणिता देवरे-चिखलीकर, माजी जि.प. सदस्या मीनल पाटील खतगावकर, राजेश पावडे, मुखेडचे माजी नगराध्यक्ष गंगाधर गोविंदराव राठोड, मुकूंद जवळगावकर, बालाजी पांडागळे, जिल्हा परिषदेचे माजी सभापती शिवराज पाटील होटाळकर, माजी आ. हणमंतराव पाटील बेटमोगरेकर यांच्या पत्नी सुशीलाबाई पाटील बेटमोगरेकर, गोविंदराव शिंदे नागेलीकर, श्रावण भिलवंडे यांनी अर्ज दाखल केला आहे.

या अर्जाची छाननी बुधवार, दि. १ जुलै रोजी होणार असून अर्ज मागे घेण्याची प्रक्रिया १६ जुलै रोजी होणार आहे. अंतिम उमेदवारांची यादी जाहीर झाल्यानंतर जिल्हा बँकेच्या निवडणुकीचे चित्र अधिक स्पष्ट होणार आहे. प्रमुख गटांमध्ये चुरशीची लढत होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. २८ जुलै रोजी मतदान पार पडणार आहे. त्यामुळे राजकारण्यांसह सहकार क्षेत्राचे लक्ष या निवडणुकीकडे लागले आहे.

--------------

**नांदेड गुरूद्वारा सुधारणा...**

चंद्रशेखर बावनकुळे यांनी ही माहिती दिली. यावेळी डॉ.विजय सतबीरसिंग यांच्यासह हजूर अबचलनगर सचखंड गुरुद्वाराचे सदस्य उपस्थित होते.

महसूलमंत्री बावनकुळे म्हणाले, नांदेड गुरुद्वाराचे पूर्ण नियंत्रण महाराष्ट्र सरकारकडे जाणार असल्याचा खोटा दावा केला गेला होता. तो पूर्णपणे फेटाळण्यात आला असून, गुरुद्वाराचे संपूर्ण संचालन केवळ शीख समाजाच्या माध्यमातूनच केले जाईल, असे स्पष्ट केले आहे. सरकारचा उद्देश गुरुद्वारावर ताबा मिळवणे नसून, वाढती भाविकांची संख्या लक्षात घेता तेथे जागतिक दर्जाच्या सोयी-सुविधा उपलब्ध करून देणे आणि व्यवस्थापन अधिक पारदर्शक करणे हाच आहे.

# विद्युत भवन समोर सीटू कामगार संघटनेचे आंदोलन

**नांदेड (प्रतिनिधी)–** महावितरणच्या विद्युत भवन कार्यालयासमोर सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियन (सीटू) च्या वतीने ३० जून रोजी आंदोलन करण्यात आले. यावेळी अधीक्षक अभियंता आणि कार्यकारी अभियंता यांना निवेदन देण्यात आले.

मौजे सोमेश्वर ता. जि. नांदेड येथील दलित कुटुंबियांच्या घरावरून जाणारे विद्युत तार काढून टाकावेत ही प्रमुख मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.




सोमेश्वर येथील पीडित कुटुंबीय प्रकाश सरोदे, नेमूबाई सरोदे, जयराज गायकवाड आदींनी विद्युत भवन नवा मोंढा येथे आमरण उपोषण सुरु केले होते. या उपोषणास पाठिंबा देण्यासाठी सीटू राज्य सचिव कॉ. उज्ज्वला पडलवार, जिल्हा सरचिटणीस कॉ. गंगाधर गायकवाड, राज्य कमिटी सदस्य कॉ. करवंदा गायकवाड, जमसंच्या राज्य सचिव मंडळ सदस्या कॉ. लता गायकवाड, डीवायएफआयचे तालुका सचिव श्याम सरोदे, कॉ. मंगेश वट्टेवाड आदी उपस्थित होते. यावेळी शहरातील विजेच्या समस्या आणि इतर अडचणी कार्यकारी अभियंता यांच्यापुढे मांडण्यात आल्या.

सोमेश्वर येथील प्रश्न सोडविण्यासाठी तात्काळ सूचना संबंधित उपअभियंता यांना देण्यात आल्या. अधिकारी यांनी दिलेल्या आश्वासनामुळे उपोषण स्थगित करण्यात आले असून, कार्यवाही झाली नाही तर पुन्हा उपोषणास बसणार असल्याचे उपोषणार्थ्यांनी सांगितले.

# उमरी येथील रासायनिक खताच्या तक्रारीच्या अनुषंगाने कृषी विभागाकडून तपासणी

**नांदेड (प्रतिनिधी)–** एका वृत्तपत्रातील २७ जून २०२६ रोजी खतामध्ये वाळूची भेसळ बातमीच्या व शेतकऱ्यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने तालुका कृषी अधिकारी कार्यालय उमरीचे कृषी अधिकारी (गुनि) आर.के. लखमोड व पंचायत समिती कार्यालय उमरीचे कृषी अधिकारी (गुनि) जोंधळे ए. सी. यांनी मातोश्री ॲग्रो एजन्सी, उमरी या कृषी निविष्ठा केंद्राची तपासणी केली.

तक्रारीतील उल्लेखीत क्लासवन ग्रो बायोटेक अँड फर्टीलायझर प्रायव्हेट लिमिटेड येळावी, ता. तासगाव, जि. सांगली या खत उत्पादक कंपनीचे क्लास वन झिंकेटेड सिंगल सुपर फॉस्फेट दाणेदार खताची प्रत्यक्षात पाहणी केली.

या खतामध्ये कुठलेही वाळूचे व रेतीचे कण आढळून आले नाहीत. तसेच खताचे दाणे फोडून बघितले असता त्याचे बारीक पीठ झाले. त्यामुळे या खतामध्ये वाळूची भेसळ नसल्याचे प्राथमिकदृष्ट्या कृषी अधिकारी (गुनि), तालुका कृषी अधिकारी कार्यालय, उमरी व कृषी अधिकारी (गुनि), पंचायत समिती कार्यालय, उमरी यांना आढळून आले आहे.

# एसआयआरसाठी अधिक सुनावणी केंद्रे स्थापन करण्याची मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड शहर आणि जिल्ह्यात ३० जूनपासून विशेष मतदार यादी सुधारणा (एसआयआर) कार्यक्रम सुरू होत आहे. ३० जूनपासून बीएलओ घरोघरी जाऊन लोकांना ई-फॉर्म वितरित करणार आहेत. ज्यांची नावे मागील २००२ च्या एसआयआरमध्ये समाविष्ट नव्हती किंवा ज्यांची नावे जुळत नाहीत, त्यांना नोटीस बजावली जाईल, त्यांची नावे व्यवस्थित करण्यासाठी कागदपत्रे मागवली जातील आणि त्यांचे म्हणणे ऐकून घेतले जाईल. या संदर्भात, कॉंग्रेस कमिटीचे शहर कार्याध्यक्ष महेश



देशमुख यांच्या नेतृत्वाखालील एका शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी कार्यालयात पोहोचून आरडीसी आंबेकर यांना एक निवेदन सादर केले.

यावेळी नांदेड शहरातील उत्तर आणि दक्षिण विधानसभा मतदारसंघात अधिक एसआयआर सुनावणी केंद्रे स्थापन करण्याची मागणी करण्यात आली. जुने शहर आणि देगलूर नाका परिसरातील नागरिकांची मोठी संख्या आणि त्यांची सोय लक्षात घेऊन उर्दू घरात सुनावणी केंद्र स्थापन करण्याची मागणी करण्यात आली. तसेच उत्तर नांदेडच्या ग्रामीण भागांसाठी लिंबगावमध्ये सुनावणी केंद्र सुरू करण्याची मागणी करण्यात आली.

या शिष्टमंडळात महेश देशमुख, कॉंग्रेस कमिटीचे अल्पसंख्याक शहर अध्यक्ष अब्दुल अझीझ कुरेशी, नगरसेवक बाबूभाई खोकेवाले, माजी नगरसेवक मुन्तजीब, सय्यद शेर अली, जावेद चाऊस, वाजिद जागीरदार, जेडी जावेद भाई यांचा समावेश होता.

# रामजी डुडुळे यांचे निधन



**किनवट (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा जनाबाई डुडुळे यांचे पती तालुक्यातील वाळकी (बु.) येथील प्रतिष्ठित नागरिक, माजी पोलीस पाटील रामजी नागोजी डुडुळे (वय ६५) यांचे अल्पशा आजाराने मंगळवार, दि. ३० जून रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी जनाबाई डुडुळे, मुले डॉ. आशिष, इंजि. अतुल डुडुळे व सून डॉ. भाग्यश्री डुडुळे, नातू असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर बुधवार, दि. १ जुलै रोजी सकाळी ११.३० वाजता वाळकी बु. येथे अंत्यसंस्कार केले जाणार आहेत.

# उत्तमराव कागणे यांचे निधन



**किनवट (प्रतिनिधी)–** गोकुंदा येथील रहिवाशी तथा किनवटचे निवृत्त तहसीलदार उत्तमराव नारायणराव कागणे (वय ६५) यांचे अल्पशा आजाराने मंगळवार, दि. ३० जून रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, १ मुलगा, १ मुलगी असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर बुधवारी सकाळी ११ वाजता गोकुंदा स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

# महाराष्ट्र पुरोगामी प्राथमिक शिक्षक संघटनेचे जिल्हाधिकारी कार्यालयावर धरणे आंदोलन



**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र पुरोगामी प्राथमिक शिक्षक संघटनेचे जिल्हाधिकारी कार्यालयावर नुकतेच राज्यव्यापी धरणे आंदोलन करण्यात आले. त्यानंतर जिल्हाधिकारी यांच्यामार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन पाठविण्यात आले. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी किरण आंबेकर यांना संघटनेच्या वतीने निवेदन देण्यात आले.

या निवेदनावर राज्य कोषाध्यक्ष जी. एस. मंगनाळे, जिल्हाध्यक्ष गोविंद मोरे, जिल्हा सरचिटणीस एम. डी. पेठकर, जिल्हा कार्याध्यक्ष सचिन पतंगे, जिल्हा प्रमुख संघटक सुरेश पाकलवाड, हिमायतनगर तालुकाध्यक्ष भीमराव केंद्रे, तालुका सरचिटणीस विष्णुकांत नाईकवाडे, जिल्हा उपाध्यक्ष व्ही. व्ही. आमनवाड, जगदिश मलगे आदींच्या स्वाक्षऱ्या होत्या.

राज्यव्यापी धरणे आंदोलनातील प्रमुख मागण्या मा. सर्वोच्च न्यायालय व शासन पत्राशी विसंगत असलेले संचालक यांचे दि. १४ मे २०२६ चे शासनपत्र अधिक्रमित करण्यात यावे.ज्या जिल्ह्यात दि. १४ मे २०२६ च्या पत्रानुसार अन्यायकारक पदोन्नती प्रक्रिया झाली आहे ती रद्द करण्यात यावी.

४ जून २०२६ च्या शासन पत्राप्रमाणे सन २०२५-२६ या वर्षातील पदोन्नतीसाठीही या महिन्यात होणाऱ्या पदोन्नती समितीच्या दिनांका दिवशीची पात्रता विचारात घेवून सेवाज्येष्ठतेने पदोन्नती व्हावी, असे निर्देश शासनस्तरावरून सर्व जिल्हा परिषदेला देण्यात आले.

टीईटी पेपर फुटीमुळे परीक्षेला बसलेल्या शिक्षकांची मानसिकता बिघडली असल्याने सेवेतील शिक्षकांना उत्तीर्णतेची अट ४० टक्के करावी व पेपर फुटीची उच्च स्तरीय चौकशी करून दोषींवर कारवाई करावी. तसेच सन २०१३ पूर्वी नियुक्त झालेल्या सर्व शिक्षकांसाठी टीईटी/सीटीईटी उत्तीर्णसाठी ४०% गुणांची अट करण्यात यावी अथवा तामिळनाडू, तेलंगणा, पंजाब या राज्याच्या धर्तीवर इयत्ता १ ते ८ वी च्या अभ्यासक्रमावर आधारित सन २०१३ पूर्वीच्या शिक्षकांची स्वतंत्र टीईटी परीक्षा घेण्यात यावी.

# हिमायतनगरात दुर्मिळ घोरपडीचे दर्शन; वनविभागाच्या तत्परतेने जीव वाचला

**नांदेड (प्रतिनिधी)–** हिमायतनगर शहरालगतच्या पळसपूर रोडवरील शेतात दुर्मिळ घोरपड आढळून आल्याने परिसरात काही काळ खळबळ उडाली. पत्रकार अनिल मादसवार यांच्या शेतातील खत-बियाणे ठेवलेल्या कोठ्यात दबा धरून बसलेली घोरपड पाहताच त्यांनी तत्काळ वनविभागाला माहिती दिली. वनविभागाच्या तत्पर कारवाईमुळे घोरपडीची सुखरूप सुटका करून तिला नैसर्गिक अधिवासात सोडण्यात आले.

नुकत्याच झालेल्या पावसामुळे शेतातील भडोळ्या बुजल्याने सरपटणारे प्राणी शेतीच्या आखाड्यात व कोठारांमध्ये आश्रय घेत असल्याचे चित्र दिसत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी शेतीची कामे करताना अधिक सतर्क राहण्याची गरज निर्माण झाली आहे.



सोमवारी सकाळी गट क्रमांक ३ मधील शेतात पेरणीच्या तयारीत शेतकरी होते. बी बियाणे, खत काढल्यानंतर कोठ्यात दुर्मिळ घोरपड आढळून आली. याची माहिती मिळताच वनपाल ज्ञानेश्वर धोंडगे यांच्या मार्गदर्शनाखाली वनमजूर शेख अहमद व सहकाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. कोणतीही इजा न होता अत्यंत शिताफीने घोरपड पकडून सुरक्षितपणे वनक्षेत्रात सोडून देण्यात आले.

वनविभागाच्या माहितीनुसार ही घोरपड विटकरी-काळ्या पट्टेदार रंगाची असून तिची लांबी सुमारे दीड फूट, रुंदी तीन इंच आणि वजन अंदाजे पाऊण ते एक किलो आहे. वन्यजीव तज्ज्ञांच्या मते, घोरपड ही शेतीसाठी उपयुक्त वन्यजीव असून ती उंदीर, कीटक आणि इतर लहान जीवांवर नियंत्रण ठेवण्यास मदत करते.

वनविभागाने नागरिकांना आवाहन केले आहे की, घोरपड किंवा इतर कोणताही वन्यजीव आढळल्यास त्याला इजा न करता त्वरित वनविभागाशी संपर्क साधावा. घोरपडीची सुरक्षित सुटका केल्याबद्दल परिसरातील नागरिकांनी वनविभागाच्या तत्परतेचे कौतुक केले असून, वन्यजीव संवर्धनासाठी नागरिकांनीही अशाच प्रकारची जागरूकता दाखवावी, असे मत व्यक्त होत आहे.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४

ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com